दैनिक
अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक ३३२ । मंगळवार १५ सप्टेंबर २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com



**लालबागचा राजा...**
देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी मुंबई येथे श्री गणेशाच्या आगमनावेळी लालबागचा राजाचे दर्शन घेतले...

## महत्वाचे..



### तरुण तेजपाल यांचे गोव्यात आत्मसमर्पण

**पणजी :** 'तहलका' मासिकाचे संस्थापक व माजी संपादक तरुण तेजपाल यांनी २०१३ मधील बलात्कार प्रकरणात सोमवारी म्हापसा येथील न्यायालयात आत्मसमर्पण केले. आत्मसम र्पणासाठी देण्यात आलेली मुदत संपण्यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने तेजपाल यांना कोणताही दिलासा देण्यास नकार दिला होता.

त्यामुळे अखेर त्यांनी न्यायालयासमोर शरणागती पत्करली.मे २०२१ मध्ये म्हापसा अतिरिक्त सत्र न्यायालयाने तेजपाल यांची या प्रकरणातून निर्दो ष मुक्तता केली होती. या निर्णयाला गोवा सरकारने मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठात आव्हान दिले. उच्च न्यायालयाने ६ ऑगस्ट रोजी सत्र न्यायालयाचा निर्णय रद्द करून तेजपाल यांना दोषी ठरवत १० वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली होती. या शिक्षेविरोधात तेजपाल यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेत आत्मसमर्पणातून सूट मागितली होती.

# ठाकरे, देशमुखांनी गुन्हा दडपला ?

## दिशा सालियन हत्या प्रकरणी सीबीआयचा एफआयआर

- ३३ हून अधिक जणांच्या भूमिकेची होणार चौकशी
- गुन्हेगारी कट, सामूहिक बलात्कार, हत्या, पुरावे नष्ट केल्याच्या आरोपांचा तपास
- मुंबईच्या राजकीय वर्तुळात खळबळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**मुंबई :** दिवंगत अभिनेता सुशांतसिंह राजपूत यांची माजी व्यवस्थापक दिशा सालियन यांच्या मृत्यू प्रकरणाला सोमवारी नवे आणि अत्यंत गंभीर वळण मिळाले. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर केंद्रीय अन्वेषण विभागाने अखेर गुन्हा दाखल करून या प्रकरणाचा नव्याने तपास सुरू केला आहे. गुन्हेगारी कट, सामूहिक बलात्कार, हत्या, पुरावे नष्ट करणे तसेच आरोपींना कायदेशीर कारवाईपासून वाचविण्यासाठी खोटी माहिती देणे यांसारख्या गंभीर आरोपांच्या अनुषंगाने तपास करण्यात येणार आहे. सीबीआयच्या एफआयआरमध्ये शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख व माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे,





माजी मंत्री आदित्य ठाकरे, माजी गृहमंत्री अनिल देशमुख, माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह, माजी पोलीस अधिकारी सचिन वाझे, अभिनेता डिनो मोरिया, सूरज पांचोली, रिया चक्रवर्ती, रोहन रॉय यांच्यासह अनेक व्यक्तींच्या भूमिकेची चौकशी आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आल्याचे वृत्त आहे. पोलीस अधिकारी, डॉक्टर, फॉरेन्सिक प्रयोगशाळेतील अधिकारी तसेच सुरक्षा रक्षकांचाही तपासाच्या कक्षेत समावेश आहे.

सीबीआयकडे दाखल झालेल्या तक्रारीतील आरोपांनुसार, दिशाच्या मृत्यूमागे कथित कट होता आणि त्यानंतर आत्महत्येची कथा पुढे करून प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करण्यात आला. सरकारी यंत्रणेचा गैरवापर, अधिकृत कागदपत्रे किंवा नोंदींमध्ये फेरफार, पुरावे दडपणे अथवा नष्ट करणे यासंदर्भातील आरोपांचाही तपास केला जाणार आहे. या आरोपांची सत्यता तपासातूनच स्पष्ट होणार असून, सध्या ते आरोपांच्या स्वरूपातच आहेत.

दिशा सालियन यांचे वडील सतीश सालियन यांनी मुलीच्या मृत्यूबाबत संशय व्यक्त करून नव्याने तपासाची मागणी केली होती. २ सप्टेंबर २०२६ रोजी मुंबई उच्च न्यायालयाने या प्रकरणात सीबीआय चौकशीचे आदेश देताना पोलिसांचा पूर्वीचा तपास अनेक प्रश्न अनुत्तरित ठेवणारा असल्याचे निरीक्षण नोंदवले. न्यायालयाने सीबीआयला वरिष्ठ व (पान ४ वर)

### सहा वर्षांनंतर प्रकरणाला निर्णायक वळण

८ जून २०२० रोजी दिशाचा मुंबईतील मालाड परिसरातील एका इमारतीवरून पडून मृत्यू झाला होता. सुरुवातीला हे प्रकरण अपघाती मृत्यू अहवालाच्या स्वरूपात हाताळण्यात आले. मात्र, कालांतराने तिच्या मृत्यूबाबत विविध संशय व्यक्त झाले. आता उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे सीबीआयने तपास हाती घेतल्याने या सर्व आरोपांची सत्यता, मृत्यूची नेमकी परिस्थिती, घटनास्थळावरील पुरावे, तांत्रिक व फॉरेन्सिक बाबी आणि यापूर्वीच्या तपासातील त्रुटी यांचा नव्याने तपास होणार आहे.

## साई मंदिरात ५४ किलो चांदीच्या नंदीचे स्वागत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** गणेश चतुर्थीच्या शुभ मुहूर्तावर आज शिर्डीच्या साईबाबांच्या चरणी अज्ञात आणि आग्रा येथील भाविकांनी मिळून जवळपास १ कोटी ३९ लाख रुपयांचे मौल्यवान दान अर्पण केले आहे. यामध्ये ५४ किलो चांदीच्या आकर्षक नंदीच्या मूर्तीचा आणि सोन्याचा मुलामा असलेल्या छत्राचा समावेश आहे.

### अज्ञात साई भक्तांकडून १ कोटी ५४ लाखांचे दान



साई समाधी मंदिराच्या गाभाऱ्यात असलेल्या नंदीच्या स्थानासाठी एका भाविकाने तब्बल ५४ किलो वजनाची चांदीची मूर्ती साईचरणी अर्पण केली आहे. या मूर्तीची शिंगे सोन्याची असून तिला इटालियन मार्बलचा अतिशय आकर्षक बेस तयार करून देण्यात आला आहे. चांदी, सोने आणि कलाकुसरीचा खर्च मिळून या नंदीमूर्तीची किंमत अंदाजे १ कोटी २० लाख रुपये आहे. संबंधित देणगीदार भाविकाच्या विनंतीनुसार त्यांचे नाव संस्थानकडून गुप्त ठेवण्यात आले आहे.

याशिवाय, उत्तर प्रदेशातील आग्रा येथील एका साईभक्ताने साईबाबांच्या मूर्तीवर छत्र धरण्यासाठी ८ किलो चांदी आणि ९८ ग्रॅम सोन्याचा मुलामा असलेले अत्यंत देखणे व आकर्षक छत्र दान दिले आहे. या छत्राची बाजारमूल्यानुसार किंमत १८ लाख ८४ हजार रुपये इतकी आहे. अशा प्रकारे आज आलेल्या या दोन्ही देणग्यांची एकूण किंमत १ कोटी ३८ लाख ८४ हजार रुपये झाली आहे.

साईबाबांच्या चरणी ही अनोखी भेट अर्पण करणाऱ्या देणगीदारांचा साई संस्थानच्या वतीने यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी साई संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडिलकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी भीमराज दराडे, जनसंपर्क अधिकारी प्रशांत सूर्यवंशी तसेच मंदिर प्रमुख विष्णू थोरात आदी अधिकारी उपस्थित होते. गणेश चतुर्थीच्या पर्वावर मिळालेल्या या देणग्यांमुळे साईभक्तांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

## कर्जतमधील व्यावसायिकाच्या आत्महत्येस सावकारकीच जबाबदार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** तालुक्यातील वीरवस्ती येथील बापू देवराम वीर या व्यावसायिकाने अवैध खाजगी सावकारांच्या जाचास कंटाळूनच गळफास घेत आत्महत्या केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. याबाबत स्वतः कर्जत पोलीस फिर्याद दाखल करतील. तसेच प्राथमिक तपासात १३ खाजगी सावकारांना कर्जत पोलिसांनी नोटिसा पाठवून त्यांना अधिक चौकशीकामी हजर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अशी माहिती कर्जतचे पोलीस उपअधीक्षक सुजीतकुमार क्षीरसागर यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी पोलीस निरीक्षक हनुमान गायकवाड उपस्थित होते.

### कर्जत पोलीसांनी खाजगी सावकारांना बजावल्या नोटिसा

बुधवार दि. ९ सप्टेंबर रोजी कर्जत शहरातील वीरवस्ती येथील बापू वीर या तरुण व्यावसायिकाने खाजगी सावकारांच्या व्याजाच्या पैसाच्या तगाद्यास कंटाळून गळफास घेत आत्महत्या केली होती. यावेळी संतप्त मयताच्या कुटुंबासह नातेवाईक आणि मित्रपरिवाराने त्याच दिवशी रास्तारोको आंदोलन करीत आत्महत्येस कारणीभूत असणाऱ्या खाजगी सावकारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली होती. यावेळी कर्जत पोलिसांनी काही खाजगी सावकारांना ताब्यात घेत चौकशी देखील केली होती. मात्र याबाबत मयताचे कुटुंबांनी पुन्हा काही विशेष रस न दाखवता सदरच्या गोष्टीकडे कानाडोळा केल्याचे लक्षात येताच कर्जत पोलीस विभाग अलर्ट होत त्यांनी (पान ४ वर)

# पैसे घेऊन तंटामुक्ती अध्यक्षानेच लावला बालविवाह

## ग्रामस्थांचा आरोप : पोलीस ठाण्याकडून दुर्लक्ष, अपर पोलीस अधीक्षकांकडे तक्रार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** तालुक्यातील पाथरे खुर्द येथील तंटामुक्ती समितीच्या अध्यक्षाने पैसे घेऊन अल्पवयीन मुलींना आमिष दाखवत त्यांचे लग्न लावून दिल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी पाथरे खुर्द (ता. राहुरी) येथील अण्णासाहेब भागवत ओटी यांनी श्रीरामपूर विभागाचे अपर पोलीस अधीक्षक यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करून संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

तक्रारीनुसार, पाथरे खुर्द येथील काशिनाथ रामनाथ जाधव हे तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष आहेत. त्यांनी गावातील काही लोकांकडून पैसे घेऊन अल्पवयीन मुलींना पैशांचे आमिष दाखवत त्यांचे विवाह लावून दिल्याचा



आरोप आहे. तक्रारीत मेघराज चव्हाण यांचाही उल्लेख करण्यात आला असून, त्यांचा एका अल्पवयीन मुलीसोबत विवाह लावून दिल्याचा दावा करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, संबंधित व्यक्तीचा आतापर्यंत तीन अल्पवयीन मुलींसोबत विवाह लावून दिल्याचा गंभीर आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे.

त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तक्रारदाराने आपल्या अर्जासोबत विवाहाचे छायाचित्र जोडले आहे. तसेच, या प्रकरणाची चौकशी करून संबंधित काशिनाथ रामनाथ जाधव आणि मेघराज चव्हाण यांच्याविरुद्ध बालविवाह प्रतिबंधक कायद्यानुसार कारवाई करण्यात यावी, अशी मागणी अपर पोलीस अधीक्षकांकडे करण्यात आली आहे.

दरम्यान, तक्रारीतील आरोपांची अधिकृत चौकशी झाल्यानंतरच त्यातील तथ्य स्पष्ट होणार आहे. बालविवाहासारख्या गंभीर सामाजिक व कायदेशीर प्रश्नावर प्रशासन आणि पोलिसांकडून कोणती भूमिका घेतली जाते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### अल्पवयीन मुलीच्या लग्नात नाचण्याचा आसुरी आनंद

बहुतेकदा कायद्याच्या धाकामुळे वाड्यावर अल्पवयीन मुलींचे लग्न गुपचूप लावले जाते. विवाह नंतर अनेक दिवसांनी सत्य समोर आले आणि गुन्हे दाखल झाल्याच्या अनेक घटना यापूर्वी घडल्या आहेत. पात्रे खुर्द येथील या घटनेत मात्र अल्पवयीन मुलीचा विवाह डॉल्बी साउंड सिस्टम लावून जाहीरपणे करण्यात आला. विशेष म्हणजे या बेकायदेशीर विवाहात खुद्द तंटामुक्तीचे अध्यक्ष जाधव यांनी देखील नाचण्याचा आसुरी आनंद घेतला असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे.

# गव्हाणवाडीत जुन्या वादातून गोळीबार

## जीवितहानी टळली : घोड नदीवरील १७ कमानी पुलाजवळ थरार

- दोन ते तीन राऊंड फायरिंग, संशयित पसार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** शिरूर–श्रीगोंदा–पारनेर तालुक्यांच्या सीमेवरील गव्हाणवाडी परिसरात जुन्या वादातून दोन गटांमध्ये गोळीबार झाल्याने सोमवारी (१४ सप्टेंबर) दुपारी परिसर हादरला. घोड नदीवरील १७ कमानी पुलाजवळ पेट्रोल पंप परिसरात दुपारी सुमारास १२ वाजता हा प्रकार घडला. प्राथमिक माहितीनुसार दोन ते तीन राऊंड गोळीबार झाला असून, सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

प्राथमिक माहितीनुसार, पारनेर तालुक्यातील म्हसे खुर्द येथील प्रशांत संदिप वाबळे, हर्षल सुनील जाधव आणि मयुर अनिल मदगे हे दुचाकीवरून शिरूरच्या दिशेने जात होते. १७ कमानी पुलाजवळ दुचाकीतील पेट्रोल संपल्याने त्यांनी वाहन थांबवले. त्यानंतर त्यांच्यापैकी एकजण पेट्रोल आणण्यासाठी गेला असताना वेरना कारमधून आलेल्या काही व्यक्तींनी गोळीबार केल्याचा आरोप आहे.फिर्यादींच्या म्हणण्यानुसार, किशोर शिंदे, प्रशांत झरेकर आणि राहुल गव्हाणे (पूर्ण नाव उपलब्ध नाही), सर्व रा. म्हसे खुर्द, यांनी गोळीबार केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. गोळीबारानंतर संशयितांनी वाहनातून घटनास्थळावरून पलायन केल्याचे सांगण्यात येत आहे.

या घटनेमागे पूर्वीचा वाद असल्याची प्राथमिक माहिती आहे. लग्नाच्या बॅनरची फाडाफाडी केल्याच्या गैरसमजातून संबंधितांमध्ये वाद निर्माण झाला होता. आपण बॅनर फाडलेला नसल्याचे सांगूनही हा वाद कायम राहिला आणि त्यातूनच पुढे हल्ल्याचे प्रकार घडल्याचा आरोप करण्यात येत आहे.

या वादातून यापूर्वी यवत तसेच पारनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीत जीवघेणे हल्ले करण्याचे प्रयत्न झाल्याची माहिती असून, त्या संदर्भात गुन्हे दाखल असल्याचे सांगण्यात येते. दोन्ही बाजूंकडून यापूर्वी परस्परविरोधी गुन्हे दाखल असल्याने जुन्या वादाला पुन्हा हिंसक वळण मिळाल्याचे चित्र आहे.

गोळीबाराची माहिती मिळताच बेलवंडी, शिरूर, पारनेर आणि सुपा पोलिसांच्या पथकांनी घटनास्थळी धाव घेतली. अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी तसेच मोबाईल फॉरेन्सिक लॅबचे पथकही घटनास्थळी दाखल झाले.सुजितकुमार श्रीरसागर उपविभागीय अधिकारी कर्जत तसेचशिरीष वमणे, उपविभागीय (पान ४ वर)

### आरोपींच्या शोधासाठी पथके रवाना

गोळीबार करणाऱ्या संशयितांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी वेगवेगळी पथके रवाना केली आहेत. भाऊसाहेब यमगर, दादासाहेब क्षिरसागर, विनोद पवार, कावरे यांच्यासह पोलिस कर्मचारी तपास पथकात सहभागी आहेत.दरम्यान, रात्री उशिरापर्यंत बेलवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. संशयित आरोपींना तातडीने अटक करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी फिर्यादींकडून करण्यात आली आहे.गव्हाणवाडी परिसरातील या गोळीबारामुळे शिरूर–श्रीगोंदा–पारनेर सीमेवरील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन संशयितांचा तातडीने शोध घेणे आणि जुन्या वादाची संपूर्ण पार्श्वभूमी तपासणे आवश्यक असल्याची चर्चा परिसरात आहे.

## ऊसतोडणीच्या वादातून तरुणाचा गळफास; पाच जणांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**हातगाव :** ऊसतोडणीसाठी दुसऱ्या मुकादमाकडून घेतलेल्या उचलीवरून झालेल्या



वादात तरुणाला मारहाण करून शिवीगाळ व जिवे मारण्याची धमकी दिल्यानंतर मानसिक त्रासातून त्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शेवगाव तालुक्यातील कोनोशी येथे घडली. या प्रकरणी शेवगाव पोलिसांनी पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. दादासाहेब अर्जुन खेडकर (वय ३०) असे मृत तरुणाचे नाव आहे.

याप्रकरणी त्यांचे वडील अर्जुन गणपत खेडकर यांनी फिर्याद दिली. त्यानुसार कैलास माणिक बडे, विष्णू बाजीराव खाडे, सारिका विष्णू खाडे, ज्ञानेश्वर बाजीराव खाडे आणि सविता ज्ञानेश्वर खाडे (सर्व रा. कोनोशी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.खेडकर कुटुंबीय शेतीसोबत ऊसतोडणीचे काम करतात. यंदा गंगामया साखर कारखान्यासाठी ऊसतोडणीला जाण्यासाठी त्यांनी देविदास निवृत्ती कराड (रा. येळी, ता. पाथर्डी) यांच्याकडून ९० हजार रुपये उचल घेतली होती. ११ सप्टेंबर रोजी सायंकाळी पावणेसातच्या सुमारास आरोपी त्यांच्या घरी आले. दुसऱ्या (पान ४ वर)



# तहलका प्रकरण : पत्रकारितेच्या नैतिकतेपासून न्यायालयीन उत्तरदायित्वापर्यंत...

**विशेष संपादकीय**
**करण नवले, संपादक**

**भारतीय पत्रकारितेच्या इतिहासात सत्तेच्या गलियार्यांना हादरवून सोडणाऱ्या धाडसी शोधपत्रकारितेसाठी तहलका हे नाव कधीकाळी वेगळ्या आदराने घेतले जात होते. मात्र त्याच संस्थेचे संस्थापक आणि माजी संपादक तरुण तेजपाल यांच्यावरील लैंगिक अत्याचाराच्या आरोपाने पत्रकारिता, संस्थात्मक सत्ता, कार्यस्थळीमहिलांचीसुरक्षितता आणि न्यायव्यवस्था यांच्याशी संबंधित अनेक अस्वस्थ प्रश्न देशासमोर उभे केले. २०१३ मध्ये सुरू झालेल्या या प्रकरणाला तब्बल तेरा वर्षांचा प्रदीर्घ न्यायालयीन प्रवास करावा लागला. अखेर १४ सप्टेंबर २०२६ रोजी तेजपाल यांनी गोव्यातील म्हापसा न्यायालयात आत्मसमर्पण केले आणि त्यांची तुरुंगात रवानगी झाली.**

या प्रकरणाची सुरुवात नोव्हेंबर २०१३ मध्ये झाली. गोव्यात तहलकाच्या 'थिंकफेस्ट' कार्यक्रमादरम्यान एका महिला सहकाऱ्याने तेजपाल यांच्यावर गंभीर लैंगिक अत्याचाराचा आरोप केला. घटनेनंतर संबंधित महिला पत्रकाराने वरिष्ठ व्यवस्थापनाकडे ई-मेलद्वारे तक्रार केली. त्यानंतर हे प्रकरण माध्यमांमध्ये आले आणि देशभर खळबळ उडाली. तेजपाल यांनी तहलकाच्या संपादकपदावरून सहा महिन्यांसाठी पायउतार होण्याची घोषणा केली.

गोवा पोलिसांनी तपास सुरू केला. तपासादरम्यान मोठ्या प्रमाणावर साक्षीदारांचे जबाब, दस्तऐवज आणि इलेक्ट्रॉनिक पुरावे संकलित करण्यात आले. फेब्रुवारी २०१४ मध्ये पोलिसांनी तब्बल २,८४६ पानी आरोपपत्र दाखल केले. त्याच वर्षी तेजपाल यांना अटक झाली होती; त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने जुलै २०१४ मध्ये त्यांना नियमित जामीन मंजूर केला.

मात्र या प्रकरणाचा खरा कस न्यायालयीन प्रक्रियेत लागणार होता. २०१७ मध्ये म्हापसा येथील सत्र न्यायालयात आरोप निश्चित झाले आणि खटला सुरू झाला. गोपनीयता आणि संबंधित व्यक्तींच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्यासाठी खटला बंद न्यायालयात चालविण्याची परवानगी देण्यात आली. पुढील काळात अभियोजन पक्षाने मोठ्या संख्येने साक्षीदार तपासले. सीसीटीव्ही फुटेज, ई-मेल, संदेश आणि अन्य इलेक्ट्रॉनिक पुराव्यांचाही विचार करण्यात आला.

२०१९ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने तेजपाल यांची आरोप रद्द करण्याची मागणी फेटाळली. त्यामुळे खटला पुढे चालू राहिला. अखेर २१ मे २०२१ रोजी म्हापसा अतिरिक्त सत्र न्यायालयाने तेजपाल यांची सर्व आरोपांतून निर्दोष मुक्तता केली. या निर्णयाने देशभर पुन्हा चर्चा सुरू झाली. न्यायालयाच्या पुराव्यांच्या मूल्यांकनावर तसेच पीडितेच्या वर्तनासंदर्भातील काही निरीक्षणांवर महिला हक्क कार्यकर्ते आणि कायदेतज्ज्ञांनी प्रश्न उपस्थित केले.

पण २०२१ चा निर्णय या प्रकरणाचा शेवट ठरला नाही. गोवा सरकारने निर्दोष मुक्ततेला मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठात आव्हान दिले. जवळपास पाच वर्षे या अपीलवर सुनावणी झाली. सरकारच्या म्हणण्यानुसार, कनिष्ठ न्यायालयाने पुराव्यांचे योग्य मूल्यमापन केले नाही; तर तेजपाल यांच्या बचाव पक्षाने कनिष्ठ न्यायालयाचा निर्णय योग्य असल्याचा युक्तिवाद केला.

६ ऑगस्ट २०२६ रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने सत्र न्यायालयाचा निर्णय बाजूला ठेवत तेजपाल यांना दोषी ठरविले आणि दहा वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली. या निकालाने २०१३ पासून सुरू असलेल्या न्यायालयीन संघर्षाला निर्णायक वळण मिळाले.

त्यानंतर तेजपाल यांनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. मात्र शिक्षेविरुद्धची अपील प्रक्रिया पुढे नेण्यापूर्वी आत्मसमर्पण करण्याची अट त्यांच्या मार्गातील महत्त्वाचा टप्पा ठरली. २५ ऑगस्ट २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयाने आत्मसमर्पणातून सूट देण्याची मागणी फेटाळली आणि त्यांना आत्मसमर्पण करून त्याचे प्रमाणपत्र सादर करण्यासाठी मुदत दिली.

अखेर १४ सप्टेंबरला तेजपाल यांनी म्हापसा न्यायालयात आत्मसमर्पण केले. त्यानंतर त्यांना कोलवाळ मध्यवर्ती कारागृहात पाठविण्यात आले. म्हणजेच, तेरा वर्षांपूर्वी आरोपांच्या केंद्रस्थानी आलेले पत्रकारितेतील एक मोठे नाव आज न्यायालयीन शिक्षेची अंमलबजावणी सुरू होण्याच्या टप्प्यावर पोहोचले आहे.

या संपूर्ण प्रकरणाकडे केवळ 'एका पत्रकाराची शिक्षा' म्हणून पाहणे अपुरे ठरेल. हा प्रसंग सत्ता कोणाकडेही असो, तिच्या वापराला उत्तरदायित्व असलेच पाहिजे, हा मूलभूत संदेश देतो. पत्रकारिता सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारते; पण पत्रकारिता संस्थांच्या आतही सत्ता-संबंध असतात. त्यामुळे माध्यमसंस्थांनी स्वतःसाठीही तेवढीच कठोर नैतिक आणि संस्थात्मक शिस्त ठेवणे आवश्यक आहे.

या प्रकरणाने आणखी एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला- न्याय मिळण्यास तेरा वर्षे लागणे हीदेखील व्यवस्थेसमोरील गंभीर बाब नाही का? आरोपीला न्यायालयीन संरक्षण मिळणे जितके आवश्यक आहे, तितकेच तक्रारदाराला निष्पक्ष, संवेदनशील आणि वेळेत न्याय मिळणेही आवश्यक आहे. खटल्यातील प्रत्येक टप्प्यावर कायद्याची प्रक्रिया पाळली जाणे आणि पुराव्यांचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन होणे, हाच न्यायाचा पाया आहे.

तहलका प्रकरणाची सर्वात मोठी शिकवण अशी की, प्रतिष्ठा, प्रसिद्धी, पद किंवा प्रभाव यापैकी कोणतीही गोष्ट कायद्यापेक्षा मोठी नाही. कनिष्ठ न्यायालयाचा निकाल असो किंवा उच्च न्यायालयाचा उलट निर्णय, शेवटी न्यायव्यवस्थेच्या प्रत्येक पायरीवर पुराव्यांची कसोटी आणि कायद्याचे अधिराज्य महत्त्वाचे ठरते.

तेजपाल यांचे आत्मसमर्पण हा या प्रदीर्घ प्रकरणाचा अंतिम अध्याय अद्याप नाही. सर्वोच्च न्यायालयातील पुढील कायदेशीर प्रक्रिया बाकी आहे. मात्र आजवरचा प्रवास एक गोष्ट स्पष्ट करतो की, पत्रकारितेची विश्वासार्हता केवळ सत्तेला आरसा दाखवण्यात नसते; ती स्वतःच्या घरातील सत्तेलाही त्याच आरशासमोर उभे करण्यात असते. तहलका प्रकरणाने हा आरसा भारतीय माध्यमविश्वासमोर कायमचा ठेवला आहे.

# गणेशोत्सव समाजप्रबोधनाचे माध्यम बनावे : आ. खताळ

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**संगमनेर :** आज समाजामध्ये व्यसन आणि नशेचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत असून, ही बाब अत्यंत चिंताजनक आहे. व्यसनमुक्त आणि नशामुक्त समाज निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेणे गरजेचे आहे. गणेश मंडळांनी डीजेला फाटा देत पारंपरिक वाद्यांना प्राधान्य द्यावे. गणेशोत्सव हा केवळ उत्सव न राहता समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम बनले पाहिजे, असे प्रतिपादन आमदार अमोल खताळ यांनी केले.

शिवसेना महायुती जनसंपर्क कार्यालय व निवासस्थानी आमदार अमोल खताळ आणि त्यांच्या पत्नी नीलम खताळ यांच्या हस्ते लाडक्या गणरायाची विधिवत पूजा करून प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी माध्यमांशी संवाद साधताना आमदार खताळ म्हणाले, गणेशोत्सवाच्या निमित्ताने सामाजिक सलोखा, व्यसनमुक्ती तसेच पर्यावरणपूरक उपक्रमांना प्राधान्य दिले पाहिजे. सण-उत्सव काही मर्यादा पाळूनच साजरे करणे आवश्यक आहे. गणेशोत्सव साजरा करताना नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, याची काळजी घेण्याची जबाबदारी गणेश मंडळांचे कार्यकर्ते, राज्यकर्ते आणि प्रशासन या सर्वांची आहे. उत्सवाचा आनंद घेत असताना सामाजिक शांतता आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित राहणे तितकेच महत्त्वाचे असल्याचे आ. अमोल खताळ यांनी सांगितले.

डीजेवर बंदीबाबत अध्यादेशनिघाला आहे. त्यामुळे गणेशभक्तांनी डी जे ऐवजी पारंपरिक वाद्यांचा वापर करण्यास प्राधान्य द्यावे. काही गणेश मंडळांनी डीजेला पर्याय म्हणून बँड पथके तयार केली आहेत. नियमांचे पालन करणाऱ्या अशा मंडळांना प्रशासनाने विनाकारण त्रास देऊ नये. उत्सवाचे नियम पाळणाऱ्या गणेश मंडळांना प्रशासनाने सहकार्याची भूमिका ठेवावी, असेही आमदार अमोल खताळ यांनी सांगितले.

# प्रवरा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसमध्ये बाप्पाचे दणक्यात आगमन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**प्रवरानगर :** प्रवरा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (अभिमत विद्यापीठ) च्या वतीने यंदा श्रीगणेशोत्सव अत्यंत उत्साहात आणि आनंदात साजरा करण्यात आला. विद्यापीठाच्या प्रांगणात बाप्पाची मोठ्या भक्तिभावाने प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली असून, यावेळी बळीराजाला संकटातून मुक्त करण्यासाठी भरपूर पाऊस पाड, अशी विशेष प्रार्थना विद्यापीठाचे कुलपती डॉ. राजेंद्र विखे पाटील यांनी श्री गणरायाच्या चरणी केली. कुलपती, डॉ. राजेंद्र विखे पाटील, विश्वस्त सुवर्णताई विखे पाटील आणि विश्वस्त ध्रुव विखे पाटील यांच्या पवित्र हस्ते श्री गणरायाच्या मूर्तीची स्थापना करण्यात आली.

प्रारंभी डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा वैद्यकीय महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी ढोल-ताशांच्या गजरात आणि वाजतगाजत एक भव्य मिरवणूक काढली. मिरवणुकीदरम्यान विद्यार्थ्यांच्या ढोल पथकाने उत्कृष्ट सादरीकरण केले, तर काही विद्यार्थ्यांनी पारंपरिक नृत्य सादर करून वातावरण अधिकच भक्तीमय व उत्साही केले.

या धार्मिक व सांस्कृतिक सोहळ्याला अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विष्णू मगरे, अधिष्ठाता डॉ. सतीश महाजन, विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, डॉक्टर विठ्ठलराव विखे पाटील प्रवरा ग्रामीण रुग्णालयाचे सर्व अधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. संपूर्ण परिसरात गणरायाच्या आगमनामुळे आनंदाचे व चैतन्याचे वातावरण पाहायला मिळाले.

# मुकींदपूर शिवारातील नियोजित श्री दत्त नवनाथ मंदिराचे भूमीपूजन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**


(छाया–सुधीर चव्हाण नेवासा)

**नेवासा :** तालुक्यातील मुकींदपूर शिवारातील यश मंगल कार्यालय परिसरात संतसेवक श्री गणेश महाराज शेजुळ यांच्या अधिपत्याखाली बांधण्यात येणाऱ्या नियोजित श्री दत्त नवनाथ मंदिराचे भूमीपूजन श्री क्षेत्र देवगड गुरुदेव दत्त पीठ संस्थानचे उत्तराधिकारी स्वामी श्री प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या हस्ते व संत महंतांसह भाविकांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

यावेळी झालेल्या श्री दत्त नवनाथ मंदिर भूमिपूजन समारंभ प्रसंगी स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या हस्ते शास्त्रोक्त पद्धतीने वेदमंत्राच्या जयघोषात नव्याने बांधण्यात येणाऱ्या मंदिराच्या जागेचे भूमीपूजन करण्यात आले.यावेळी आलेल्या सर्व संत महंतांचे व भाविकांचे श्री दत्त नवनाथ मंदिराचे प्रमुख हभप गणेश महाराज शेजुळ यांनी स्वागत करून संतपूजन केले.

त्रिवेणीश्वर देवस्थानचे महंत श्री रमेशानंदगिरी बाबांनी प्रास्ताविक करतांना सर्वांनी या मंदिरासाठी खारीचा वाटा उचलावा असे आवाहन केले.यावेळी सात गुंठे जागा दान करणारे शंकरराव निपुंगे,दत्तात्रय निपुंगे, प्रशांत निपुंगे यांचा यावेळी स्वामी प्रकाशानंदगिरी बाबांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

मंदिर निर्माण कार्यासाठी सर्वांनी हातभार लावावा तसेच मंदिर तयार झाल्यानंतर त्याचे पूजापाठ नित्यनेमाने करून पावित्र्य जपवावे,मनुष्याने जीवनात संपत्ती जरूर कमवावी मात्र आपल्या मुलांना चांगले संस्कार ही देण्याचा त्यांनी प्रयत्न करावा,आजची मुले ही दररोज मंदिरात दर्शनासाठी आले पाहिजे,आईवडीलांचा आदर ही त्यांनी केला पाहिजे म्हणून मुलांवर चांगले संस्कार करा असे आवाहन त्यांनी यावेळी बोलताना केले.

यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी त्रिवेणीश्वर देवस्थानचे महंत रमेशानंदगिरी महाराज, पिचडगाव येथील माऊली आश्रमाचे प्रमुख ज्ञानेश्वर महाराज हजारे, सीताराम महाराज पठाडे, भारत महाराज लोढे,दत्तात्रय महाराज व्यवहारे, प्रमोद महाराज रोकडे, पोपट महाराज भणगे, पावन गणपती मंदिराचे सेवेकरी दत्तात्रय महाराज गायकवाड, सोमनाथ महाराज पानकडे, दत्ताभाऊ कांगुणे, सीताराम निपुंगे, डॉ.मुकुंद हारदे, संभाजीराव मते, ड. अशोक करडक, संतसेवक बन्सीभाऊ आगळे, रावसाहेब घुमरे, मेजर ज्ञानेश्वर बर्डे,सरपंच पोपटराव हजारे, दशरथराव मुंगसे, बाळासाहेब देवखिळे,पोलीस पाटील आदेश साठे यांच्यासह पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.पत्रकार सुधीर चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले तर संतसेवक गणेश महाराज शेजूळ यांनी केले या प्रसंगी उपस्थित भाविकांना खिचडी प्रसादाचे वाटप करण्यात आले.

# कोल्हार येथे रामदेव बाबा जन्मोत्सव उत्साहाच्या वातावरणात साजरा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**


(छाया- गणेश कुंभकर्ण)

**कोल्हार :** येथील माहेश्वरी समाज व श्री रामदेव बाबा भक्त परिवार यांच्या वतीने रामदेव बाबा यांचा जन्मोत्सव सोहळा व सत्संग मोठ्या उत्साहात व भक्तिमय तसेच मंगलमय वातावरणात साजरा करण्यात आला.

यावेळी पत्रकार प्रमोद कुंभकर्ण यांचा विनोद बंग यांनी सत्कार केला. या कार्यक्रमास या कार्यक्रमास संगमनेर श्रीरामपूर तसेच कोल्हार येथील श्री रामदेव बाबा भक्त परिवार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी विनोद बंग व आशा बंग प्रमोद बंग व भिकू शेठ बंग सुरेखा बंग संतोष बंग आशा बंग संगमनेर येथील जुगलकिशोर असावा व जयश्री असावा यांच्या वतीने उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सतीश बंग गोपाल बंग राहुल बंग मयूर बंग हर्षद बंग गोविंद बंग कृष्णा बंग शुभम बंग यश बंग व परिवारातील सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# श्रीरामपुरात गणरायाचे उत्साहात स्वागत



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** शहरात गणेश चतुर्थीनिमित्त गणरायाचे उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात स्वागत करण्यात आले. सोमवार, १४ सप्टेंबर रोजी सकाळपासूनच शहरातील विविध भागांत गणेशमूर्तींच्या आगमनाची लगबग सुरू होती. गणेशभक्तांनी पारंपरिक पद्धतीने पूजा-अर्चा करून लाडक्या बाप्पाची प्रतिष्ठापना केली.

गणपती बाप्पाच्या आगमनासाठी विविध गणेश मंडळांनी आकर्षक सजावट, फुलांची आरास आणि विद्युत रोषणाई केली होती. ढोल-ताशा, हलगी व पारंपरिक वाद्यांच्या गजरात गणरायाच्या मूर्ती मंडपात आणण्यात आल्या. 'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया'च्या जयघोषाने शहरातील वातावरण भक्तिमय झाले होते.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत असून, पुढील दिवसांत विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी अनेक मंडळांकडून विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत.

# शहरात घरोघरी गणरायाची उत्साहात प्रतिष्ठापना

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**


छाया : राजेंद्र परदेशी

**राहुरी :** राहुरी शहरासह तालुक्यात लाडक्या गणरायाच्या स्वागतासाठी बालगोपालांसह तरुण तरुणी आबालवृद्धांसह उत्साहाच्या वातावरणात ढोल-ताशांच्या गजरात घराघरात व आपल्या मंडळात भक्तीभावाने गणरायाची प्रतिष्ठापना करण्यात आली. यावर्षी राहुरी शहरातील बाजारपेठेत गणेशमूर्तींच्या खरेदीसाठी भक्तांचा उत्साह मोठ्या प्रमाणात वाहत होता. परंतु यंदा गणेशमूर्तींच्या किमतीत तब्बल ४० टक्क्यांनी वाढ झाल्याने गणेशभक्तांच्या आर्थिक बजेटवर याचा परिणाम दिसून आला असला तरी आपल्या लाडक्या गणरायासाठी भाविक भक्तांनी आपल्या आपल्या बजेट प्रमाणे खर्च करून गणरायाचे मनोभावे स्वागत केले आहे.

राहुरी शहरातील प्रमुख बाजारपेठेतमध्ये गणेशमूर्तीचे दुकाने मोठ्याआकर्षक पद्धतीने सजली आहेत. भाविक भक्तांनी सहकुटुंब सहपरिवारे आपल्या घराला साजेल अशी योग्य आकाराची व आवडीची गणेश मूर्ती निवडण्यासाठी महिला, युवक, युवती तसेच लहान मुले कुटुंबीयांसमवेत मोठ्या प्रमाणात बाजारात गर्दी करत असल्याने बाजारपेठ सजली आहे. गणेशमूर्ती सजवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या विविध रंग, पीओपी साहित्य, अनेक कच्च्या मालाच्या किमतीत वाढ झाल्याने मूर्तीच्या दरात वाढ करावी लागल्याचे राहुरी येथील विक्रेत्यांकडून सांगण्यात आले आहे. प्रत्येक कुटुंबीय बाजारातून श्री गणेशाची मूर्ती वाजत गाजत घरी आणून मोठ्या भक्ती भावाने प्रतिष्ठापना केली आहे

काल सकाळीच श्री संत गाडगेमहाराज आश्रम व कैलासवासी लालाशेट बियाणी विद्यामंदिर शाळेतील विद्यार्थ्यांनी ढोलताशांच्या मिरवणुकीने शाळेत गणरायांची विधिवत स्थापना केली. गजरात या मिरवणुकीत विद्यार्थी भक्तीभावाने व उत्साहाने सहभागी झाले होते.

# शेतकरी हिताला प्राधान्य देत संस्थेने व्यवसाय विस्तारावा : शालिनीताई विखे

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**लोणी :** शेतकऱ्यांना विविध सेवा-सुविधा उपलब्ध करून देत शेती उत्पादनाला आधार देण्याच्या उद्देशाने सहकारी संस्थांची स्थापना झाली. आज या संस्थांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मोठा आधार मिळत आहे. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या दूरदृष्टीतून उभी राहिलेली प्रवरा फळे-भाजीपाला उत्पादक, प्रक्रिया, खरेदी-विक्री सहकारी संस्था शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण ठरत असून, संस्थेने विविध व्यवसायांचा विस्तार करून उत्पादनवाढीसह सभासदांच्या हिताला प्राधान्य द्यावे, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांनी केले.

प्रवरा फळे-भाजीपाला उत्पादक, प्रक्रिया, खरेदी-विक्री शेतकरी सहकारी संस्थेची ४२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे अध्यक्ष मकरंद गुणे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी उपाध्यक्ष विजयराव लगड, ॲड. आप्पासाहेब दिघे, दत्ता शिरसाठ, सहसचिव भारत घोगरे, अण्णासाहेब जोशी, रामनाथ आहेर, माधवराव कडसकर, वैशाली गिरमे, व्यवस्थापक प्रदीप सोनवणे यांच्यासह संस्थेचे संचालक, सभासद व कर्मचारी उपस्थित होते. शालिनीताई विखे म्हणाल्या की, प्रवरा फळे-भाजीपाला संस्थेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना विविध सेवा-सुविधा मिळत आहेत. संस्थेने सुरू केलेला खत पुरवठा उपक्रम ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे. साखर कारखान्याच्या माध्यमातून निर्माण झालेल्या विविध सहकारी संस्थांमुळे परिसरातील सर्वसामान्य नागरिक आणि सभासदांना मोठ्या प्रमाणावर सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. संस्थेने भविष्यात विविध व्यवसायांचा विस्तार करून उत्पादनवाढीसाठी प्रयत्न करावेत. स्वतंत्र रोपवाटिका सुरू करण्याबरोबरच बाभळेश्वर येथील कृषी विज्ञान केंद्राच्या सहकार्याने ऊस उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे, असे आवाहन त्यांनी केले.

# गणेशखिंड येथील वरद गजानन उत्सवाला सुरुवात

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**टाकळीभान :** श्रीरामपूर तालुक्यात श्रीक्षेत्र गणेशखिंड येथील वरद गजानन उत्सवास कालपासून सुरुवात झाली असून सालाबादप्रमाणे यंदाही गणेशोत्सव काळात विविध धार्मिक व आध्यात्मिक आयोजन कार्यक्रमांचे करण्यात आले आहे, उत्सव यशस्वीतेसाठी विश्वस्त मंडळ व भक्त मंडळाकडून जोरदार तयारी सुरू आहे. सोमवार. दि. १४ सप्टेंबरपासून सोहळ्यास प्रारंभ झाला असून शुक्रवार, दि. २५ सप्टेंबर रोजी सांगता होणार आहे, श्रीक्षेत्र देवगडचे मठाधिपती महंत भास्करगिरी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने व श्रीक्षेत्र देवगडचे महंत स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे. तसेच श्रीक्षेत्र आंबेजोगाई येथील मुकुंदराजस्वामी संस्थानचे अध्यक्ष किसन महाराज पवार, श्रीक्षेत्र हनुमानगड संस्थानचे संतोष महाराज चौधरी, श्रीक्षेत्र आळंदी देवाची येथील कृष्णा महाराज वाघुले, कारवाडी आश्रमाचे संदिप महाराज जाधव व श्रीक्षेत्र गणेशखिंड देवस्थानचे भरत महाराज नरोडे यांच्या उपस्थितीत विविध कार्यक्रम होणार आहेत. उत्सव काळात सकाळी अखंड ज्योत प्रज्वलन व महापूजेने कार्यक्रमाचा प्रारंभहोईल. सकाळी ७ वाजता गणेशयात्रा, ८ वाजता गणेशाची महाआरती, दररोज सकाळी व सायंकाळी ७ वाजता महाआरती, सकाळी ७.३० वाजता ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी १ वाजता संतचरित्र कथा, दुपारी ३ वाजता कीर्तन आणि सायंकाळी ५ वाजता हरिपाठ असे विविध कार्यक्रम होणार आहेत. तसेच दररोज सकाळी व सायंकाळी विविध मान्यवरांच्यावतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १४ ते २० सप्टेंबरदरम्यान दररोज दुपारी १ वाजता श्रीमद् देवी भागवत महापुराण कथा होणार आहे. तर दि. २१ ते २४ सप्टेंबरदरम्यान श्रीक्षेत्र कारवाडी आश्रमाचे संदिप महाराज जाधव यांच्यावतीने योगीराज सद्गुरू गंगागिरीजी महाराज चरित्र कथा आयोजित करण्यात आली आहे.

तरी पंचक्रोशीतील भाविकांनी या धार्मिक कार्यक्रमाचा घ्यावा, असे आवाहन विश्वस्त देवस्थान पंचक्रोशी, भक्त मंडळ व भजनी मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय-कोहिनूर प्लाझा, दुसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक: करण बाबासाहेब नवल RNI No. MAHM-R/2019/82605 www.rashtrasahyadri.com owner publisher Printer Kakasaheb Babasaheb Nawale To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur, Dist., Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: Karan Babasaheb Nawale RNI No M-HM-R/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmailID- rashtrasahyadrigmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26)

# ‘बळीराजाला सुखी कर, महाराष्ट्र दुष्काळमुक्त होऊ दे’ ; विखेंची गणरायाला प्रार्थना

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : भरपूर पाऊस पडून राज्यातील बळीराजाला सुखी कर, आणि दुष्काळमुक्त महाराष्ट्राचा संकल्प पूर्ण होऊ दे, अशी प्रार्थना करीत जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी गणेशोत्सवाच्या निमित्ताने राज्यातील जनतेला शुभेच्छा दिल्या. राज्यात दुष्काळाचे असलेले सावट लक्षात घेऊन जलसंपदा विभागाने पाण्याचे योग्य नियोजन केले असून, राज्यातील सर्वच विभागांची माहिती संकलित झाल्यानंतर टंचाई परिस्थितीबाबत मुख्यमंत्री निर्णय घेतील, अशी माहिती त्यांनी माध्यमांशी बोलताना दिली.



प्रवरा उद्योग समूहाच्या गणेशोत्सवाचा प्रारंभ मंत्री विखे पाटील यांच्या शुभहस्ते श्रीगणेशाची प्रतिष्ठापना करून करण्यात आला. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याच्या कार्यस्थळावर ना. राधाकृष्ण विखे पाटील आणि जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे पाटील यांच्या शुभहस्ते श्रीगणेशाची पूजा करण्यात आली. याप्रसंगी कारखान्याचे चेअरमन डॉ. सुजय विखे पाटील, ट्रक वाहतूक सोसायटीचे चेअरमन नंदू राठी, व्हा. चेअरमन सोपानराव शिरसाठ, कार्यकारी संचालक महेश कोनापूरे यांच्यासह प्रवरा उद्योग समूहातील सर्व संस्थांचे पदाधिकारी, संचालक, अधिकारी, कामगार आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

यंदाच्या वर्षी पावसाचे प्रमाण समाधानकारक नाही; तरीही राज्यातील सर्व धरणे भरली आहेत. अल निनोच्या संकटाचे परिणाम आता प्रत्यक्षपणे जाणवू लागले आहेत. पावसाने दडी मारल्यामुळे संकट अधिक तीव्र होत असून बळीराजा पावसाच्या प्रतीक्षेत आहे. आजपासून सुरू झालेल्या गणेशोत्सवाच्या निमित्ताने हे विघ्न दूर करण्यासाठी तसेच दुष्काळमुक्त महाराष्ट्राचा संकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी विघ्नहर्त्याने आम्हांला शक्ती द्यावी, अशी प्रार्थना केली असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

राज्यातील धरणांमध्ये पाणी उपलब्ध झाले असले तरी २०२७ पर्यंत या पाण्याचे नियोजन करावे लागणार आहे. शेतीला पाणी द्यावे लागणारच आहे; परंतु पिण्याच्या पाण्यास जलसंपदा विभागाने सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. चारा पिकांसाठीही पाण्याची गरज भासणार आहे. मराठवाडा आणि विदर्भातसुद्धा चिंताजनक परिस्थिती आहे. परतीचा पाऊस किती प्रमाणात होतो याचा अंदाज अद्याप नाही. राज्यातील सर्व परिस्थितीचा अंदाज घेऊन मदत व पुनर्वसन विभाग तसेच आपत्ती व्यवस्थापनाकडून येणाऱ्या आकडेवारीनंतर सर्वसमावेशक निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वखाली होतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

नैसर्गिक संकट लक्षात घेऊन महायुती सरकारने राज्यातील शेतकऱ्यांची ३६ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अतिशय संवेदनशीलतेने घेतलेल्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. संकटाच्या समयी शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची भूमिका ही महायुती सरकारची आहे. सद्य परिस्थितीत निर्माण झालेल्या टंचाईबाबतही सरकार गंभीर असून, मुख्यमंत्री या संदर्भात योग्य निर्णय करतील, असे मंत्री विखे पाटील म्हणाले.

## द • ख • ल

### रामराव आदिक पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्याची वैद्यकीय शिक्षणासाठी निवड



**श्रीरामपूर** : अशोकनगर येथील रामराव आदिक पब्लिक स्कूलचा विद्यार्थी ओम सुनील पाचपिंड याची महाराष्ट्रातील अग्रगण्य वैद्यकीय महाविद्यालय सेठ. जी. एस.मेडिकल कॉलेज व केईएम रुग्णालय मुंबई येथे वैद्यकीय शिक्षणासाठी निवड झाली असल्याची माहिती विद्यालयातील शिक्षक दिलीप वैराळ यांनी एका पत्रकाद्वारे दिली. त्याच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेच्या वतीने त्याचे अभिनंदन करण्यात आले. त्याने आपल्या शालेय जीवनापासूनच अभ्यासात सातत्य, मेहनत आणि जिद्द कायम ठेवली. आपल्या ध्येयाचा पाठपुरावा करत त्याने वैद्यकीय क्षेत्रात प्रवेश मिळवून आपल्या कुटुंबासह शाळेचेही नाव उज्ज्वल केले आहे.

### निर्भय महाराष्ट्र पार्टीच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी

**टाकळीभान** : भ्रष्टाचार व अन्यायाविरोधात लढणाऱ्या निर्भय महाराष्ट्र पार्टीच्या विविध युवा पदाधिकाऱ्यांच्या निवडी टाकळीभान येथे नुकत्याच पार पडल्या. पक्षाचे संस्थापक तथा राज्याध्यक्ष जितेंद्र भावे आणि अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष शितलताई गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली या निवडी करण्यात आल्या. यावेळी प्रशांत लावरे यांची श्रीरामपूर तालुका अध्यक्षपदी, विजय बिरदवडे यांची टाकळीभान शहराध्यक्षपदी, किशोर आकोदे यांची श्रीरामपूर युवा अध्यक्षपदी, तर सागर सोनवणे यांची श्रीरामपूर युवा जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली. देशातील भ्रष्टाचार, अन्याय व अत्याचाराचे उच्चाटन व्हावे, जात-धर्माच्या पलीकडे जाऊन राजकारण व्हावे, तसेच शासकीय यंत्रणांकडून जनतेची कोणत्याही प्रकारे लूट होऊ नये, यासाठी संघटना काम करणार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

### ‘एव्हरेस्ट’चा राष्ट्रीय स्तरावर दबदबा; ६९ विद्यार्थी ‘टॉप टेन’मध्ये




**श्रीरामपूर** : एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीच्या श्रीरामपूर शाखेने पुन्हा एकदा आपल्या गुणवत्तेचा ठसा उमटवला आहे. नेवासा येथे संपन्न झालेल्या ५६ व्या नॅशनल लेव्हल अबॅकस स्पर्धेत श्रीरामपूरच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना संचालिका सोनाली ठाणगे यांचे मार्गदर्शन लाभले. राज्यभरातील बाराशे विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. श्रीरामपूर व परिसरातील ९९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. त्यापैकी तब्बल ६९ विद्यार्थ्यांनी देशात पहिल्या दहामध्ये स्थान पटकावत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. देवयानी होले, प्रत्यूष पटारे, संस्कृती मागुंडे व श्रेया सदाफळ या चार विद्यार्थ्यांनी चॅम्पियन पद पटकावले. यावेळी अबॅकसचे सर्व स्तर पूर्ण करणाऱ्या १८ विद्यार्थ्यांना ‘अबॅकस मास्टर’ या पदवीने गौरविण्यात आले.

## मुळा कारखान्यावर गणरायाची प्राणप्रतिष्ठा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**सोनई** : मुळा सहकारी साखर कारखान्याच्या वतीने काल मुळा उद्योग समूहाचे संस्थापक जेष्ठ नेते यशवंतरावजी गडाख साहेब व कारखान्याचे मार्गदर्शक माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली काल कारखाना कार्यस्थळावर गणरायाची प्राणप्रतिष्ठा कारखान्याचे विद्यमान चेअरमन भाऊसाहेब मोटे व माजी चेअरमन नानासाहेब तुवर यांच्या हस्ते व अरुण देवा यांच्या मंत्र उपचाराने विधिवत पूजन करून मोठ्या उस्थाहत प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.

याप्रसंगी कारखान्याचे कार्यकारी संचालक शरद बेल्हेकर, सेक्रेटरी रितेश टेमक, शेतकी अधिकारी विजय फाटके, चिफ इंजिनिअर दिपक नवले, प्रशासन अधिकारी संजय टेमक, कारखान्याचे एच. आर. भोर महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाचे उपाध्यक्ष डी. एम. निमसे, मुळा कारखाना राष्ट्रीय साखर कामगार युनियनचे अध्यक्ष अशोकराव पवार, डिस्टलरी मॅनेजर बाळासाहेब दरंदले, कार्यालयीन अधीक्षक योगेश घावटे, परचेस अधिकारी देशमुख, उपशेतकी अधिकारी चावरे, साखर विक्री विभागाचे सुदाम कोरडे, अजय करण, युनियनचे उपाध्यक्ष कारभारी लोडे, खजिनदार सुभाष सोनवणे सह सर्व अधिकारी , गणेश सांस्कृतिक मंडळाचे सर्व सदस्य व कर्मचारी यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी कारखान्याचे ज्येष्ठ अधिकारी वसंतराव भोर यांनी सर्वांना गणेश चतुर्थी व येणारा गळीत हंगाम चांगल्या पद्धतीने पार पडो अशा शुभेच्छा दिल्या.

## राहुरीत १६ सप्टेंबरला मोफत नेत्र, दंत तपासणी शिबिर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय, हडपसर (पुणे) संचलित नेत्र तपासणी केंद्र, राहुरी, दिव्यांग शक्ती सेवा संस्था, राहुरी आणि राहुरी तालुका प्रहार दिव्यांग संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने जगन्नाथ विठ्ठल सूर्यवंशी यांच्या मातोश्री कै. तुळसाबाई विठ्ठल सूर्यवंशी यांच्या पाचव्या पुण्यस्मरणानिमित्त मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया व दंत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

बुधवार, दि. १६ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत नगर-मनमाड रोडवरील संत गाडगे महाराज आश्रमशाळा, राहुरी येथे हे शिबिर होणार आहे. शिबिरात नागरिकांची निःशुल्क नेत्र व दंत तपासणी करून आवश्यक सल्ला व मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

तपासणीमध्ये मोतीबिंदू आढळलेल्या रुग्णांची एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय, पुणे येथे मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

शस्त्रक्रियेसाठी निवड झालेल्या रुग्णांच्या पुणे येथील ये-जा, निवास व भोजनाची व्यवस्था आयोजकांकडून निःशुल्क करण्यात येणार आहे.

रुग्णांनी आधारकार्ड, सुरू असलेली औषधे तसेच वैद्यकीय अहवाल सोबत आणावेत. परिसरातील गरजू नागरिकांनी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## शेत जमिनीत जेसीबी घालणाऱ्यास अडवल्याने ठार मारण्याची धमकी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील ब्राम्हणी येथील बानकर वस्ती परिसरात शेतजमिनीत बेकायदेशीर जमाव करून जेसीबीच्या सहाय्याने अनधिकृतपणे प्रवेश केल्याचा प्रकार समोर आला आहे. तसेच जेसीबी अडविण्याचा प्रयत्न करणाऱ्या फिर्यादी व साक्षीदारांना जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याच्या आरोपावरून सहा जणांविरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मंजूर रमजान शेख (वय ४०, व्यवसाय शेती, रा. ब्राम्हणी, बानकर वस्ती, ता. राहुरी) यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

फिर्यादीत नमूद केल्यानुसार, शनिवार दि. १२ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास ब्राम्हणी शिवारातील गट क्रमांक ८८५ (२) मधील शेतजमिनीत हा प्रकार घडला. आरोपींनी बेकायदेशीर जमाव जमवून जेसीबीच्या सहाय्याने फिर्यादीच्या शेतजमिनीत अनधिकृतपणे प्रवेश केला. यावेळी फिर्यादी व साक्षीदारांनी जेसीबी अडविण्याचा प्रयत्न केला असता आरोपींनी त्यांना धमकावत, जेसीबीच्या समोर आलात तर तुम्हाला जीवे ठार मारून टाकू, अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकारामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते या प्रकरणी रज्जाक शेरखों शेख, कंकर नुमहम्मद शेख, रज्जाक उस्मान शेख, शेरों बाबुभाई शेख, सहाम शौकत शेख आणि हमीद बाबुभाई शेख (सर्व रा. ब्राम्हणी, ता. राहुरी) यांच्याविरुद्ध भारतीय न्यायसंहिता कलम ३२९, १८९(२), १९१(२), १९०, ३५२ व ३५१(२) अन्वये राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १०४०/२०२६ दाखल करण्यात आला आहे.

या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार बबन राठोड करीत आहेत.

## वडिलोपार्जित जमिनीच्या वादातून भास्कर गवारे यांची हत्या ?

### कुटुंबीयांना संशय : सावत्र भावावर आरोप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : वडिलोपार्जित जमिनीच्या वाटपाच्या वादातून आपल्या वडिलांच्या हत्येची शक्यता असल्याचा अर्ज पोलिसांकडे दिल्यानंतर काही काळातच वडील रक्तबंबाळ अवस्थेत आढळून त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणाचा पोलिसांनी सखोल तपास करून खुनाचा गुन्हा दाखल करावा, तसेच संशयित आरोपींना अटक करावी, अशी मागणी ॲड. पांडुरंग भास्कर गवारे यांनी पत्रकार परिषदेत केली. ॲड. गवारे यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या वडिलांच्या वडिलोपार्जित संपत्तीच्या वाटपातून त्यांचा खून होण्याची शक्यता असल्याबाबत २७ मे २०२४ रोजी श्रीरामपूर पोलीस ठाण्यात अर्ज देण्यात आला होता. त्यानंतर २९ जून २०२४ रोजी वडाळगाव शिवारातील दगडाच्या खाणीत त्यांचे वडील रक्तबंबाळ अवस्थेत आढळून आले.

उपचारासाठी नेत असताना त्यांचा मृत्यू झाल्याचे त्यांनी सांगितले. या घटनेनंतर पोलिसांनी वडिलांच्या मृत्यूचा तपास करून खुनाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी करण्यात आली होती. मात्र, पोलिसांकडून अपेक्षित तपास होत नसल्याचा आरोप ॲड. गवारे यांनी पत्रकार परिषदेत केला. काही व्यक्तींनी दबाव आणून तक्रार मागे घेण्यासाठी धमकावल्याचाही त्यांनी दावा केला. दरम्यान, वडिलोपार्जित जमिनीच्या वादातून राष्ट्रीय श्रीराम संघाचे तालुकाध्यक्ष रोहित यादव व गवारे कुटुंबातील काही सदस्यांसह इतर व्यक्तींनी आपल्याला त्रास दिल्याचा आरोपही त्यांनी केला. आपल्याला जबरदस्तीने वाहनातून नेऊन एमआयडीसी परिसरातील एका कारखान्याजवळ सोडण्यात आल्याचा, तसेच या प्रकरणात वापरलेल्या वाहनाचा पोलिसांनी तपास करावा, अशी मागणी त्यांनी केली.

रोहित यादव व संदेश हळके यांच्यावरही त्यांनी पत्रकार परिषदेत गंभीर आरोप केले असून, या प्रकरणातील सर्व संबंधितांची चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. तसेच, धमक्या मिळत असल्याने आपल्या व कुटुंबीयांच्या जीवितास धोका असल्याचे सांगत संबंधित व्यक्तींविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करून संरक्षण द्यावे, अशी मागणी ॲड. गवारे यांनी पोलिसांकडे केली आहे. दरम्यान, पत्रकार परिषदेत करण्यात आलेले हे आरोप संबंधित व्यक्तींवरील दोष सिद्ध करणारे नसून, या आरोपांची पोलिसांकडून निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे.

## पुणतांब्यात ढोल-ताशांच्या गजरात गणरायाची प्रतिष्ठापना

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**पुणतांबा** : ढोल-ताशांचा गजर, फटाक्यांची आतषबाजी आणि ‘गणपती बाप्पा मोरया’च्या जयघोषात पुणतांबा येथे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी गणरायाची उत्साहात प्रतिष्ठापना केली. गणरायाच्या जयघोषाने परिसर भक्तिमय झाला होता. गणेश प्रतिष्ठापनेच्या पार्श्वभूमीवर सकाळपासूनच स्टेशन रस्त्यावर घरगुती गणपतीच्या मूर्ती घेण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनीही वाजतगाजत मिरवणूक काढत श्रींची प्रतिष्ठापना केली. स्टेशन रस्त्यावर ट्रॅक्टरमध्ये गणेशमूर्ती ठेवून ढोल-ताशांच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. हनुमान व्यायाम मंडळ, महारुद्र शिवाजी तरुण मंडळ, गणेश मंडळ, एकता मित्र विहार, संत गोरोबा आखाडा, विक्रम मित्र मंडळ आदी सार्वजनिक मंडळांनी उत्साहपूर्ण वातावरणात गणरायाची प्रतिष्ठापना केली. यावर्षी बारा दिवस गणेशोत्सव असल्याने सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या वतीने विविध धार्मिक, सांस्कृतिक तसेच सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे पुढील काही दिवस पुणतांबा परिसरात गणेशोत्सवाचा उत्साह पाहायला मिळणार आहे. दरम्यान, गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राहुरीचे पोलीस निरीक्षक दीपक सरोदे यांच्या उपस्थितीत शांतता समितीची बैठक घेण्यात आली. बैठकीस सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी तसेच राजकीय कार्यकर्ते उपस्थित होते. गणेशोत्सव काळात मंडळांनी प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करावे. नियमांचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलीस निरीक्षक सरोदे यांनी दिला.

## लेझीम-ढोलताशांच्या गजरात सुजाता इंटरनॅशनल स्कूलमध्ये गणरायाचे स्वागत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**सोनई** : येथील सुजाता इंटरनॅशनल स्कूलमध्ये गणेश चतुर्थीच्या शुभमुहूर्तावर सोमवारी (दि. १४) श्री गणेशाची विधिवत व भक्तिमय वातावरणात स्थापना करण्यात आली. गणरायाच्या आगमनाने शाळेच्या परिसरात उत्साह, आनंद आणि भक्तिभावाचे वातावरण निर्माण झाले. विद्यार्थ्यांच्या लेझीम व ढोल-ताशा पथकाने तालबद्ध वादन करीत मिरवणुकीतून गणरायाचे जल्लोषात स्वागत केले. गणरायाच्या स्वागतासाठी शाळेच्या परिसरात रंगीबेरंगी झेंडे, पताका, फुलांची सजावट व विद्युत रोषणाई करण्यात आली होती. अंगणात आकर्षक रांगोळी काढण्यात आली होती. ‘गणपती बाप्पा मोरया’च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध पद्धतीने मिरवणुकीत सहभागी होत गणरायाचे स्वागत केले. गणेशमूर्तीची विधिवत पूजा-अर्चा करून दुर्वा, फुले, हार व नैवेद्य अर्पण करण्यात आला. संस्थापक किरण सोनवणे व मुख्याध्यापिका ज्योती सोनवणे यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. यावेळी विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी भक्तिभावाने सहभाग घेतला. महाआरतीनंतर उपस्थितांना मोदक, पेढे व खिरापतीचा महाप्रसाद वाटप करण्यात आला. महाआरतीनंतर पावसाच्या सरी बरसल्याने वातावरण अधिकच प्रसन्न झाले. शाळेत साजरा होणारा गणेशोत्सव विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, परंपरा, शिस्त, एकोपा व सामाजिक मूल्यांची ओळख करून देणारा संस्कारक्षम उपक्रम ठरला. गणेशोत्सवाच्या तयारीपासून स्वागत, सजावट व विविध कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यक्रमाचे नियोजन सहशिक्षिका पल्लवी तनपुरे व सहशिक्षक जाधव यांनी केले. शाळेतील सर्व शिक्षकांनी सजावट, मिरवणूक, पूजा, महाआरती व महाप्रसादाचे नियोजन करण्यासाठी सहकार्य केले. शिक्षक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सामूहिक प्रयत्नांतून गणेशस्थापना सोहळा उत्साहपूर्ण व शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. शाळेच्या प्रगतीसह विद्यार्थी, शिक्षक, पालक व कर्मचाऱ्यांच्या सुख-समृद्धीसाठी यावेळी मंगलकामना करण्यात आली.

## अवैध वाळु तस्करीला उधाण, सरपंच आक्रमक; आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**राहुरी** : राहुरी तालुक्यातील चिंचोली येथील प्रवरा नदीपात्रातून गत काही दिवसां पासून मोठ्या प्रमाणात अवैध वाळूतस्करीला ऊत आला आहे. या अवैध वाळु वाहतूकीने गाव परिसरातील नुकतेच डांबरीकरण व काँक्रिटीकरण झालेले रस्ते खचले असून मोठमोठे खड्डे पडले आहेत. ग्रामस्थांना अशा जीवघेण्या रस्त्यावरुन ये-जा करावी लागत आहे. प्रशासनाने जुजबी कारवाई करुन परतताच पुन्हा ही वाहतूक सुरु होत असते.

यावर प्रशासनाकडून कडक धोरण अवलंबत ही अवैध वाळुवाहतूक कायमस्वरुपी बंद करावी अन्यथा आंदोलनाचा इशाराच चक्क सरपंच शोभाताई लाटे यांनी दिला आहे. चिंचोली येथील प्रवरा नदीपात्र वाळू तस्करांसाठी मोकळे मैदान बनले आहे. कुणी, कधीही नदीपात्रात उतरुन सर्रास वाळू उपसा करीत आहे. जेसीबी, डंपर सह अत्याधुनिक यंत्रसामग्री वापरुन नदीपात्रात पाणी असूनही नदीचे पात्र अक्षरश: ओरबाडले जात असल्याचे त्यांनी म्हटले आहे.यामुळे नदीच्या नैसर्गिक प्रवाहाला धोका निर्माण होत आहे. पर्यायाने परिसरातील पाणी पातळी खालावली आहे. नदीपात्रा लगतच्या शेतकऱ्यांच्या विहिरींना यामुळे धोका निर्माण झाला आहे. वाळूचा अधिकृत लिलाव सुरू असल्यासारखी वाळूची मोठमोठी वाहने सुरू असल्याने गाव परिसरातील या अवजड वाहनाने पक्के रस्ते खचले आहेत.

प्रशासन याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष तर करत नाही ना? असा सवाल यानिमित्ताने उपस्थित होत आहे. रात्रंदिवस सुरु असलेल्या या वाहनांमुळे गावातील रस्त्यांची प्रचंड दुरावस्था झाली असून, अपघातांचा धोकाही प्रचंड वाढला आहे. प्रशासनाने तातडीने या वाळू तस्करांवर कडक कायदेशीर कारवाई करावी व ही अवैध वाळु वाहतूक कायमची थांबवावा, अन्यथा चिंचोली ग्रामस्थांच्या वतीने आंदोलनाचा इशारा सरपंच शोभाताई लाटे सह ग्रामस्थांनी दिला आहे. अवैध वाळु वाहतूकी बरोबरच गाव परिसरात अवैध दारुची विक्री मोठ्या प्रमाणात सुरु आहे.

त्यावर पोलीस प्रशासनाला निवेदन देण्यात आले. मात्र थातूरमातूर कारवाई केली जात आहे. गावात वाळुवाहतूक व अवैध व्यवसायाचा प्रशासनाने कायमचा बंदोबस्त करण्याची मागणी सरपंच सौ. लाटे यांनी केली आहे.

## कृत्रिम बुद्धिमत्तेपुढे भावनात्मक व संवेदनात्मक आव्हान : प्रा. डॉ. सदानंद भोसले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**झरेकाठी** : जोपर्यंत संख्यात्मक माहिती साहित्याशी जोडली जात नाही, तोपर्यंत कृत्रिम बुद्धिमत्तेची साहित्यिक उपयोगिता पूर्णपणे सिद्ध होणार नाही. कृत्रिम बुद्धिमत्ता स्मार्ट सहायक म्हणून उपयुक्त असली, तरी ती भावनात्मक व संवेदनात्मक संवाद साधू शकत नाही, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या हिंदी विभागाचे प्रमुख व हिंदी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. सदानंद भोसले यांनी केले. लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सात्रळ आणि महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने हिंदी महोत्सव २०२६ निमित्त आयोजित एकदिवसीय आंतरविषयक राष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बीजभाषक म्हणून बोलत होते. डॉ. भोसले म्हणाले, दर्जेदार साहित्य कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यासाठी उच्च शैक्षणिक संस्थांनी पुढाकार घेऊन दर्जेदार साहित्याचे लेखन व संगणकीय माध्यमांवर उपलब्धता वाढविणे गरजेचे आहे. कार्यशाळेत हैदराबाद केंद्रीय विद्यापीठाचे डॉ. प्रकाश कोपार्डे यांनी आंतरविषयक शिक्षणातील कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सकारात्मक व नकारात्मक बाबींचा आढावा घेतला. डॉ. दीपक तुपे, प्रा. डॉ. साताप्पा चव्हाण, प्रा. सचिन कदम, प्रा. डॉ. जितेंद्र पाटील, डॉ. संदीप तपासे व प्रा. नीलेश जाधव यांनी विविध सत्रांत मार्गदर्शन केले. समारोपप्रसंगी प्रा. डॉ. साताप्पा चव्हाण यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०च्या अनुषंगाने कार्यशाळांमुळे विद्यार्थ्यांना नवीन दृष्टिकोन मिळतो, असे सांगितले. महाराष्ट्रासह कर्नाटक, उत्तर प्रदेश, हैदराबाद, केरळ व मध्य प्रदेशातील प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रभारी प्राचार्य डॉ. सोपान शिंगोटे यांनी स्वागत केले. डॉ. भाऊसाहेब नवले यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. अनंत केदारे यांनी सूत्रसंचालन व आभार मानले.

## पान १ वरून

### ठाकरे, देशमुखांनी गुन्हा दडपला ?

अनुभवी अधिकाऱ्याची नियुक्ती करून तक्रारदाराचा जबाब नोंदवण्यास आणि गुन्हा दाखल करून सर्व पैलूंचा तपास करण्याचे निर्देश दिले.न्यायालयाने मात्र या आदेशातून कोणत्याही व्यक्तीविरुद्ध दोषाचा निष्कर्ष निघत नसल्याचे स्पष्ट केले आहे. तपासादरम्यान पुरेसे साहित्य आणि वाजवी संशय निर्माण झाल्यासच संबंधित व्यक्तीला आरोपी मानले जाईल, असे न्यायालयाने बजावले आहे.

दिशा सालियन प्रकरणातील आरोप आता राजकीय आरोप-प्रत्यारोपांच्या पलीकडे जाऊन केंद्रीय तपास यंत्रणेच्या अधिकृत तपासाच्या कक्षेत आले आहेत. त्यामुळे सीबीआयच्या तपासातून नेमके काय निष्पन्न होते, कोणाविरुद्ध ठोस पुरावे समोर येतात आणि या मृत्यूचे गूढ उकलते का, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

### गव्हाणवाडीत जुन्या वादातून गोळीबार

पोलीस अधिकारी, नगर ग्रामीण; संतोष मुटकुळे, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा; सहायक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर; पारनेरचे सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे; बेलवंडी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक विजयकुमार कौठावळे यांच्यासह पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले.पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून पुरावे संकलित करण्यास सुरुवात केली आहे. गोळीबारात कोणत्या शस्त्राचा वापर झाला, नेमके किती राऊंड फायरिंग झाले, आरोपींची संख्या किती होती आणि घटनेमागील नेमके कारण काय, याचा तपास सुरू आहे.

### कर्जतमधील व्यावसायिकाच्या आत्महत्येस सावकारकीच जबाबदार

वरील प्रकरणात लक्ष घालत अधिक तपास सुरू केला आहे. बापू देवराम वीर यांनी खाजगी सावरकरांच्या जाचास कंटाळूनच आत्महत्या केली असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न होत असून या प्रकरणी कर्जत पोलीस स्वतः फिर्यादी होणार असल्याची माहिती कर्जतचे पोलीस उपअधीक्षक सुजीतकुमार क्षीरसागर यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली. यात काही खाजगी सावकारांचा समावेश असून त्यांना यासबंधी नोटीस देखील कर्जत पोलीसांनी बजावल्या आहेत. १३ खाजगी सावकारांचा यात समावेश असून लवकरच त्यांना तपासकामी कर्जत पोलीस विभाग चौकशसाठी बोलावतील. अशी माहिती पोलीस उपअधीक्षक क्षीरसागर यांनी दिली.

सावकाराचा त्रास असेल, त्यांनी पुढे यावे -कर्जत पोलीस उपविभागातर्गत सर्वसामान्य नागरिकांच्या आर्थिक मजबुरीचा फायदा घेत अव्वाच्या-सव्वा व्याज घेणारे सावकार त्रास देत असतील तर त्यांनी वैयक्तीक आपल्याशी किंवा सबंधित पोलीस ठाण्याच्या प्रमुखांशी संपर्क साधावा. तक्रारदार यांचे नाव गुपीत ठेवले जाईल. कोणी टोकाचे पाऊल उचलू नये.

– सुजीतकुमार क्षीरसागर, पोलीस उपअधीक्षक, कर्जत

### ऊसतोडणीच्या वादातून तरुणाचा गळफास; पाच जणांविरुद्ध गुन्हा

मुकादमाकडून उचल घेतल्याने त्यांच्यासोबत येणे शक्य नसल्याचे सांगितल्यावर वाद झाला. फिर्यादीनुसार, तीन आरोपींनी दादासाहेब यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली, तर दोन महिलांनी चपलेने मारहाण केली. शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकीही देण्यात आली.

या घटनेनंतर दादासाहेब मानसिकदृष्ट्या खचले होते. १२ सप्टेंबर रोजी सकाळी सहाच्या सुमारास पत्नी मनिषा यांनी त्यांना घरातील लोखंडी अँगलला ओढणीने गळफास घेतलेल्या अवस्थेत पाहिले. कुटुंबीयांनी दरवाजा तोडून त्यांना खाली उतरवून शेवगाव ग्रामीण रुग्णालयात नेले; मात्र डॉक्टरांनी मृत घोषित केले.

१३ सप्टेंबर रोजी फिर्यादीवरून भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बाजीराव भानुदास सानप करीत आहेत.

# कर्कश आवाज टाळून आनंददायी गणेशोत्सव साजरा करा : आ. सत्यजित तांबे



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** गणेशोत्सव हा सर्वांना आनंद देणारा सण आहे. मात्र कर्कश आवाजामुळे सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी, महिला व ज्येष्ठांना त्रास होतो. त्यामुळे ध्वनिप्रदूषण टाळून आनंददायी पद्धतीने गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहन आमदार सत्यजित तांबे यांनी केले.

महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या निवासस्थानी जगन्नाथपुरी येथील रथाची प्रतिकृती व कृषी संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या आरासीत गणेशमूर्तीची स्थापना करण्यात आली. आमदार सत्यजित तांबे यांच्या प्रभा निवासस्थानीही गणरायाची स्थापना करण्यात आली. यावेळी माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, सामाजिक कार्यकर्त्या कांचनताई थोरात, डॉ. जयश्रीताई थोरात, राजवर्धन थोरात, नगराध्यक्ष डॉ. मैथिली तांबे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

आमदार तांबे म्हणाले, गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नगर परिषदेने शहरात गेल्या पंधरा दिवसांपासून तयारी केली आहे. सार्वजनिक मंडळांनी प्रशासनाला सहकार्य करावे. डीजेला आपला व्यक्तिशः विरोध असून, कर्कश आवाजामुळे विद्यार्थ्यांसह महिला व वृद्धांना त्रास होतो. त्याऐवजी विविध स्पर्धांचे आयोजन करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे.

डॉ. जयश्रीताई थोरात यांनी गणरायाच्या चरणी पृथ्वीवरील संकटे दूर करण्याची प्रार्थना केली. दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती यामुळे सजीवसृष्टीसमोर आव्हाने निर्माण झाली असून माती, पाणी व हवेचे संरक्षण करणे प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

राजवर्धन थोरात यांनी जगन्नाथपुरीच्या रथाची प्रतिकृती व कृषी संस्कृतीचा संगम असलेल्या आरासीतून भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविल्याचे सांगितले. डॉ. सुधीर तांबे यांनी गणेशोत्सवातून एकता व समतेचा संदेश मिळतो, तर डॉ. मैथिली तांबे यांनी सर्वांच्या जीवनात आनंद व समृद्धी नांदो, अशी प्रार्थना केली.

# ग्रामीण विकासाचे शिल्पकार : लोकनेते मारुतरावजी घुले पाटील



शेवगाव-नेवासा परिसराच्या सामाजिक, राजकीय आणि विकासाच्या वाटचालीत घुले पाटील कुटुंबाचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण राहिले आहे. लोकनेते मारुतरावजी घुले पाटील यांनी सर्वसामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून विकासाचे जे स्वप्न पाहिले, त्या स्वप्नाला त्यांच्या पुढील पिढ्यांनी आपल्या कर्तृत्वाने आकार देण्याचे काम केले आहे. त्यांच्या ९६व्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याला विनम्र अभिवादन.

लोकनेते मारुतरावजी घुले पाटील यांनी शेवगाव-नेवासा परिसराच्या विकासासाठी दूरदृष्टीने काम केले. ग्रामीण भागातील नागरिकांना शिक्षण, शेती, सिंचन, सहकार आणि मूलभूत सुविधांचा लाभ मिळावा, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. विकासाची संकल्पना केवळ एखाद्या भागापुरती मर्यादित न ठेवता सर्वसामान्यांच्या जीवनमानात बदल घडवून आणण्याची त्यांची भूमिका होती. त्यामुळे त्यांच्या कार्याची छाप आजही परिसरातील जनमनावर कायम आहे.

त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा पुढे नेत नरेंद्र घुले पाटील यांनी शेवगाव-नेवासा भागाचे दोन वेळा विधानसभेत प्रतिनिधित्व केले. आपल्या कार्यकाळात त्यांनी मतदारसंघातील विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले. जनतेशी असलेला सातत्यपूर्ण संपर्क आणि विकासकामांची तळमळ यामुळे त्यांनी आपल्या कर्तृत्वाची स्वतंत्र ओळख निर्माण केली.

नरेंद्र घुले पाटील यांचे दुसरे चिरंजीव माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील यांनी शेवगाव-पाथर्डी मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करताना अल्पावधीत मोठ्या प्रमाणावर विकासनिधी आणून विविध विकासकामांना चालना दिली. मतदारसंघातील रस्ते, पाणी, शिक्षण, आरोग्य आणि इतर मूलभूत सुविधांच्या प्रश्नांना प्राधान्य देत त्यांनी विकासाचा वेग वाढविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यांच्या कार्यकाळात मतदारसंघाच्या विकासाला नवी दिशा मिळाली.

घुले पाटील कुटुंबातील पुढील पिढीनेही ही विकासाची परंपरा कायम ठेवली आहे. नातू डॉ. क्षितिज घुले पाटील यांनी शेवगाव पंचायत समितीचे सभापती म्हणून काम करताना तालुक्यातील विविध विकासकामांना गती दिली. तर स्नुषा राजश्रीताई घुले पाटील यांनी अहमदनगर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळताना जिल्ह्याच्या विकासात योगदान दिले. पद कोणतेही असो, जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देत विकासाची दिशा कायम ठेवण्याचा प्रयत्न या कुटुंबाने केला आहे.

कर्तृत्व, जिद्द, संघर्षशील वृत्ती, सुसंस्कृतपणा आणि चारित्र्यसंपन्नता या गुणांच्या बळावर घुले पाटील कुटुंबाने जनतेच्या मनात आपले स्थान निर्माण केले आहे. लोकनेते मारुतरावजी घुले पाटील यांनी पाहिलेले नवनिर्मितीचे स्वप्न त्यांच्या पुढील पिढ्या साकार करण्यासाठी प्रयत्नशील आहेत, हीच त्यांच्या कार्याला खरी आदरांजली ठरते.

आज लोकनेते मारुतरावजी घुले पाटील यांच्या ९६व्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतींना उजाळा देताना त्यांच्या विकासवादी विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प करणे हीच काळाची गरज आहे. त्यांच्या कार्याचा आदर्श भावी पिढ्यांना प्रेरणा देत राहील, यात शंका नाही. अशा या विकासद्रष्ट्या लोकनेत्यास विनम्र अभिवादन !

**शब्दांकन : भाऊसाहेब सावंत**
**संकलन : बाळासाहेब आरगडे**



# १२ कोटींच्या विकासकामांचे आ. प्रशांत बंब यांच्या हस्ते लोकार्पण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** शहर व तालुक्यातील प्रशासकीय सुविधांना बळकटी देणाऱ्या तब्बल १२ कोटी ७५ लाख रुपयांच्या विविध विकासकामांचे लोकार्पण व भूमिपूजन आमदार प्रशांत बंब यांच्या हस्ते १३ सप्टेंबर रविवारी करण्यात आले. या कामांमुळे शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांसह नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध होणार आहेत.

यावेळी ३ कोटी ७० लाख रुपये खर्चून उभारलेल्या व्हीव्हीआयपी विश्रामगृह इमारतीचे लोकार्पण करण्यात आले. तसेच तहसीलदार व नायब तहसीलदारांसाठी ४ कोटी ३५ लाख रुपयांच्या निधीतून बांधण्यात आलेल्या पाच निवासस्थानांचे लोकार्पण आले.भूमि अभिलेख कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी ५ कोटी रुपये खर्चाच्या निवासस्थानांच्या बांधकामाचे भूमिपूजन यावेळी करण्यात आले. त्यामुळे तालुक्यातील प्रशासकीय यंत्रणेसाठी आवश्यक निवास व पायाभूत सुविधांमध्ये भर पडणार आहे.दरम्यान, आमदार प्रशांत बंब यांनी राष्ट्रमाता जिजाऊ प्रतिष्ठान व गणेश मित्र मंडळाच्या गणपती बाप्पाच्या आगमन सोहळ्यास उपस्थित राहून गणरायाचे दर्शन घेतले. कार्यक्रमास तहसीलदार नवनाथ वगवाड, नायब तहसीलदार सचिन वाघमारे, सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे उपविभागीय अभियंता दिलीप कोलते,सहायक अभियंता पी. पी. काशेटवार, अक्षय शिंदे,कनिष्ठ अभियंता नागेश कुकडे, विद्युत उपविभागाचे उपअभियंता तौसीब याकूब दारूवाले, कनिष्ठ अभियंता अंजली संगवे यांच्यासह मंडळ अधिकारी,तलाठी व बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

भाजपा तालुकाध्यक्ष रवींद्र चव्हाण, किशोर धनायत, भाग्येश गंगवाल, आबासाहेब शिरसाठ, कृष्णा सुकासे, सचिन विधाटे, गणेश चव्हाण, विजय पानकडे, मारुती खैरे, कृष्णकांत व्यवहारे, आनंद पाटील, नगरसेवक राकेश कळसकर, ज्ञानेश्वर सवई, राजेंद्र राठोड, दीपक साळवे यांच्यासह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**Change Of The Name**

I HAVE CHANGE MY OLD NAME **SWAPNIL DATTATRAYA WAGH** ( BEFORE NAME ) TO NEW NAME AS **SWAPNIL DATTATRAY WAGH** (AADHAR NO. 6396 9217 8149) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC VAMBORI
PLACE: VAMBORI
DATE : 12/09/2026


# डीजेमुक्त, व्यसनमुक्त गणेशोत्सवासाठी आदर्श मंडळांना पुरस्कार : पो. नि. प्रताप दराडे

### प्रथम क्रमांकास १० हजारांचे बक्षीस

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक सलोखा, संस्कार, पर्यावरण संवर्धन, व्यसनमुक्ती आणि सुरक्षिततेचा संदेश देणाऱ्या गणेश मंडळांना प्रोत्साहन देण्यासाठी नेवासा पोलिस ठाणे व प्रेस क्लबच्या संयुक्त विद्यमाने 'नेवासा आदर्श गणेशोत्सव गौरव पुरस्कार' देण्यात येणार आहे. या उपक्रमातून डीजेमुक्त व व्यसनमुक्त गणेशोत्सवाला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

या स्पर्धेत नेवासा पोलिस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील गणेश मंडळांचा समावेश राहणार आहे. प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या मंडळास १० हजार रुपये, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांकास ५ हजार रुपये, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, तर तृतीय क्रमांकास ३ हजार रुपये, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या स्पर्धत भाग घेण्यसाठी गणेश मंडळांना पोलीस प्रशासनाची परवानगी घेतलेली असणे आवश्यक आहे

मंडळांची निवड करण्यासाठी एकूण १०० गुणांचे निकष निश्चित करण्यात आले आहेत. त्यामध्ये डीजेमुक्त गणेशोत्सवाला सर्वाधिक ३० गुण, प्रशासनाची परवानगी असणे यासाठी



१०गुण आदर्श व पर्यावरणपूरक सजावटीसाठी २० गुण, व्यसनमुक्ती जनजागृतीसाठी २० गुण, शिस्त व सुरक्षेसाठी १० गुण, स्वच्छता व निमर्ल्य व्यवस्थापनासाठी १० गुण देण्यात येणार आहेत. मंडळाच्या परीक्षणासाठी पोलीस प्रशासनाचे पंच म्हणू सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल पवार सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश नागरगोजे गोपनीय अंमलदार भारत बोडके पत्रकार सुधीर चव्हाण, मोहन गायकवाड, सुहास पठाडे आदींचा समावेश आहे.

पर्यावरणपूरक सजावट, थर्माकोलचा वापर टाळणे, सामाजिक, ऐतिहासिक किंवा विज्ञानाधारित देखावे, ध्वनिप्रदूषणास आळा, वाहतुकीस अडथळा होणार नाही याची दक्षता, आपत्कालीन वाहनांसाठी मार्ग मोकळा ठेवणे, स्वयंसेवकांची नियुक्ती, सीसीटीव्ही व्यवस्था, महिला सुरक्षेची काळजी तसेच मंडप परिसरातील स्वच्छता या बाबींनाही विशेष महत्त्व दिले जाणार आहे.

गणेशोत्सव हा केवळ उत्सव न राहता सामाजिक प्रबोधन आणि संस्कारांचा केंद्रबिंदू व्हावा, तसेच गणेश मंडळांनी समाजापुढे आदर्श निर्माण करावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. बक्षीस पात्र गणेश मंडळांना जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या हस्ते दोन ऑक्टोबर रोजी स्वतंत्र समारंभात बक्षीस वाटप होणार आहे

तरी या उपक्रमामध्ये जास्तीत जास्त गणेशोत्सव मंडळांनी सहभागी व्हावे असे आवाहन गुरुप्रसाद देशपांडे अध्यक्ष प्रेस क्लब नेवासा आणि पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी केले आहे

## निधन वार्ता

### मच्छिंद्र गायकवाड



**वडाळा महादेव :** येथील वारकरी धार्मिक अध्यात्मिक पंथाचे मच्छिद्र मुरलीधर गायकवाड (वय ८२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्याच्या पश्चात पत्नी, मुले, सुना, नातवंडे, पुतणे असा मोठा परीवार आहे. येथील सामाजीक कार्यकर्ते दिलीप गायकवाड संजय गायकवाड तसेच माजी सैनिक तथा महाराष्ट्र पोलिस दलातील मेजर विजय गायकवाड यांचे ते वडील होत.

### लिलाबाई लेलकर



**टाकळीभान :** श्रीरामपूर तालूक्यातील टाकळीभान येथील महिला भजनी मंडळाच्या सदस्या व उत्कृष्ठ भजनी श्रीमती लिलाबाई अहिलाजी लेलकर (वय ७०) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात तीन भाऊ, दोन बहिनी असा परिवार आहे. अशोक कारखान्याचे माजी संचालक एकनाथ लेलकर, विठ्ठल देवस्थान ट्रस्टचे सचिव नानासाहेब लेलकर, व प्रा. बाळासाहेब लेलकर यांच्या त्या भगिनी होत.



# आदर्श विद्यालयात गणरायाचे स्वागत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** स्व.तुकाराम गडाख पानसवाडी, येथील हनुमान ग्रामीण संशोधन शिक्षण मंडळ संचालित आदर्श विद्यालयात संस्थेचे अध्यक्ष जयश्रीताई गडाख व सचिव रविराज गडाख यांच्या हस्ते गणेश मूर्तीची स्थापना करण्यात आली. चिरंजीव मिमाश व मुलगी ईरा यांनी ढोल ताशाच्या गजरामध्ये फुलांची उधळण करत विद्यार्थी, विद्यार्थिनी शिक्षक, सोबत मोठ्या उत्साहात श्री गणेशाची स्थापना करण्यात आली. यावेळी हार, फुले, दुर्वा, खिरापत पेढे, अर्पण करत भक्तिमवातावरणात आरती करण्यात आली.माध्यमिक, उच्च माध्यमिक चे मुख्यध्यापक यांच्या मार्गदर्शनाखाली रांगोळीचे सुंदर रेखाटन करून भव्य दिव्य हिंदू संस्कृती नुसार गणेश चतुर्थी निमित्त गणेशाचे स्वागत केले.

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 10/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 17/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |
| 20/04/2026 to 24/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 555 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 01/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 08/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 15/05/2026 | 566 79 270 | 370 04 239 | | | |


सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

**नशिबाची परिक्षा**

मंगळवार, दि.१५ सप्टेंबर २०२६

**मिलनम डे**

उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

१७९ २७८ ३७७ — ६ - ३ — १५० २४० ६००

जोड ७०-४६-३१ २५-६९

**कल्याण**

उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

११५ १५२ २५० — ९ - ३ — १९५ ६५२ ४५०

जोड ०७-१३-२६- ८९-३४

**मुंबैम (मेन)**

उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

१५६ १२९ ११० — ५ - ९ — १३० १४९ ११२

जोड २०-८४-५१- ७९-४३



सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

# बीडला सुविधा द्या, पण अहिल्यानगरकरांवर अन्याय नको!

## बीड-अहिल्यानगर-पुणे रेल्वे सुरू करा : पण अहिल्यानगरची तिकीट खिडकी कायम ठेवा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** बीड-अहिल्यानगर-पुणे रेल्वे सेवा १७ सप्टेंबरपासून सुरू होत असल्याने बीड आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. या निर्णयाबद्दल रेल्वे प्रशासनाचे स्वागत करत असतानाच, नवीन रेल्वे सेवेसाठी अहिल्यानगर रेल्वे स्थानकावरील तिकीट खिडकी किंवा कर्मचाऱ्यांची एक शिफ्ट बीड येथे हलविण्याच्या प्रस्तावाला अहिल्यानगर-पुणे इंटरसिटी ट्रेन असोसिएशनने तीव्र विरोध केला आहे. असोसिएशनचे अध्यक्ष हरजीतसिंग वधवा यांनी याबाबत पुणे विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक (ऊछच्) यांच्याकडे निवेदन देऊन हा निर्णय तातडीने पुनर्विचारात घ्यावा, अशी मागणी केली आहे. निवेदनाची प्रत मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक, मुंबई तसेच रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनाही देण्यात येणार आहे.



अहिल्यानगर रेल्वे स्थानकावर सध्या सकाळच्या वेळेत दोन तिकीट खिडक्या, तसेच संध्याकाळपर्यंत दोन खिडक्या कार्यरत असतात. याशिवाय दिवसभर एक तिकीट खिडकी सकाळी ८ ते रात्री ८ वाजेपर्यंत कार्यरत असते. सध्याच्या व्यवस्थेतही प्रवाशांना अनेकदा रांगेत उभे राहावे लागते. अहिल्यानगर स्थानकावर दररोज सुमारे ३५० ते ४०० तिकिटांची विक्री होते, तर विविध सेवांसाठी सुमारे १५० ते १८० तिकिटे दररोज बुक केली जातात. बीड-अहिल्यानगर-पुणे सेवा सुरू झाल्यानंतर प्रवाशांची संख्या आणि तिकीट बुकिंगमध्ये आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

अशा परिस्थितीत अहिल्यानगरमधील विद्यमान कर्मचारी किंवा एक शिफ्ट बीडला हलविल्यास उर्वरित तिकीट खिडक्यांवर अतिरिक्त भार पडेल. परिणामी प्रवाशांच्या रांगा वाढणे, तिकीट मिळण्यास विलंब होणे आणि तिकीट बुकिंग व्यवस्थेची कार्यक्षमता कमी होणे यासारख्या समस्या निर्माण होऊ शकतात. विशेष म्हणजे अहिल्यानगर रेल्वे स्थानकावरील इंटरनेटचा वेगही अनेक वेळा कमी असल्याने तिकीट काढण्याच्या प्रक्रियेला वेळ लागतो. त्यामुळे उपलब्ध कर्मचारीसंख्या कमी करण्याऐवजी प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची गरज असल्याचे असोसिएशनने म्हटले आहे.

बीडला नवीन रेल्वे सेवा सुरू होत आहे, ही अत्यंत आनंदाची बाब आहे. मात्र नवीन सेवा सुरू करताना अहिल्यानगरचा कर्मचारी कमी करून बीडला देणे योग्य नाही. नवीन सेवेसाठी नवीन मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे. अहिल्यानगरमध्ये सध्या दोन तिकीट खिडक्याही प्रवाशांच्या तुलनेत कमी पडत आहेत. त्यामुळे एक खिडकी किंवा शिफ्ट कमी केल्यास अहिल्यानगरच्या प्रवाशांच्या अडचणी आणखी वाढतील, असे हरजीतसिंग वधवा यांनी सांगितले.



रेल्वे प्रशासनाने अहिल्यानगरची विद्यमान तिकीट व्यवस्था कायम ठेवावी आणि बीडसाठी आवश्यक अतिरिक्त कर्मचारी उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी असोसिएशनने केली आहे. बीडला सुविधा मिळणे हा अहिल्यानगरच्या प्रवाशांचा विरोधाचा विषय नाही. मात्र एका शहराची सुविधा वाढवताना दुसऱ्या शहराची सुविधा कमी करणे योग्य ठरणार नाही. दोन्ही शहरांतील प्रवाशांना समान आणि पुरेशा सुविधा मिळणे हा रेल्वे प्रशासनाचा उद्देश असावा, अशी भूमिका असोसिएशनने स्पष्ट केली आहे.

अहिल्यानगरच्या प्रवाशांच्या मूलभूत तिकीट सुविधेवर कोणतीही कपात स्वीकारली जाणार नाही. हा निर्णय मागे न घेतल्यास अहिल्यानगर-पुणे इंटरसिटी ट्रेन असोसिएशनच्या वतीने प्रवाशांच्या हितासाठी शांततापूर्ण, लोकशाही आणि कायदेशीर मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. दरम्यान, बीड-अहिल्यानगर-पुणे रेल्वे सेवा सुरू केल्याबद्दल रेल्वे प्रशासनाचे असोसिएशनने आभार मानले असून, या सेवेमुळे बीड आणि अहिल्यानगरच्या प्रवाशांना पुण्याशी अधिक चांगली जोडणी मिळणार असल्याचे नमूद केले आहे.

# द•ख•ल

## ढोल-ताशांच्या गजरात श्री गणरायाची कोरडगावात उत्साहात स्थापना

**कोरडगाव :** गणरायाच्या आगमनाची आतुरतेने वाट पाहणाऱ्या कोरडगाव ग्रामस्थांचा उत्साह गणेश चतुर्थीच्या दिवशी शिगेला पोहोचला. ढोल-ताशांचा गजर, गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषात तसेच गुलालाची उधळण करीत गावातील विविध मंडळांच्या वतीने श्री गणरायाची उत्साहात स्थापना करण्यात आली. गणेशोत्सवानिमित्त सकाळपासूनच गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. गणेशमूर्तींची आकर्षक सजावट करून वाजतगाजत मिरवणुकीने मंडपात आणण्यात आल्या. ढोल-ताशांच्या तालावर युवकांनी ठेका धरत गणरायाचे जल्लोषात स्वागत केले. महिला, युवक, बालकांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने या मिरवणुकीत सहभागी झाले होते. गणेशमूर्तींची विधिवत पूजा, आरती व मंत्रोच्चाराने स्थापना करण्यात आली. यावेळी 'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. अनेक गणेश मंडळांनी सामाजिक संदेश देणारी आकर्षक सजावट व विद्युत रोषणाई केली आहे. गणेशोत्सव काळात विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याने ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. गणेशोत्सव शांतता, बंधुभाव आणि सामाजिक एकोप्याने साजरा करण्याचा निर्धार मंडळांच्या कार्यकर्त्यांनी केला आहे. पारंपरिक पद्धतीने ढोल-ताशांच्या गजरात झालेल्या गणरायाच्या आगमनामुळे कोरडगावात उत्साहाला उधाण आले असून, पुढील काही दिवस गाव भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघणार आहे. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या!'च्या जयघोषात गणरायाच्या आगमनाने कोरडगाव नगरी भक्तिरसात रंगून गेली.

## शिक्षकांच्या प्रश्नांसाठी 'दरबार' ठरतोय प्रभावी; आ. किशोर दराडे यांचा सत्कार



**अहिल्यानग :** शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विविध प्रलंबित प्रश्न सातत्याने मार्गी लावण्यासाठी शिक्षक दरबाराच्या माध्यमातून प्रयत्न करणारे शिक्षक आमदार किशोर दराडे यांचा सामाजिक कार्यकर्ते तथा पै. नाना डोंगरे यांनी सत्कार केला. अहमदनगर जिल्हा माध्यमिक शिक्षक सोसायटीला आमदार किशोर दराडे यांनी भेट दिली असता हा सत्कार करण्यात आला. यावेळी नगर तालुका तालीम सेवा संघाच्या अध्यक्षपदी पै. नाना डोंगरे यांची फेरनिवड झाल्याबद्दल आमदार किशोर दराडे यांनी डोंगरे यांचा सत्कार करून त्यांच्या कार्याचे कौतुक केले. यावेळी शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड, शिक्षण उपसंचालक गणपत मोरे, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन बाबासाहेब बोडखे, संभाजी पाटील, माजी चेअरमन आप्पासाहेब शिंदे, सुनील पंडित, महेंद्र हिंगे, दिलीप काटे, वैभव सांगळे, अशोक आव्हाड, सुनील भोर, सचिन झगडे, अमोल ठाणगे, रवींद्र देवडे, राजेंद्र डमाळे, रवींद्र गावडे, तौसीफ शेख, सुधाकर सुंबे, आमदार किशोर दराडे यांचे स्वीय सहाय्यक हरीश मुंडे, संभाजी थोरात आदी उपस्थित होते.

## दहेश्वर विद्यालयात बाप्पाचे आगमन



**अमरापुर :** श्री मारुतरावजी घुले पा शिक्षण संस्थेचे दहेश्वर माध्यमिक विद्यालय दहिफळ जूने ता शेवगाव आज विद्यालयात सालाबादप्रमाणे गणेश मूर्तीची विधिवत पूजाअर्चा करून स्थापना करण्यात आली या प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक इंगावले सर, नंदु पा भोसले (शा.व्य.स.अध्यक्ष) विशाल जोशी, देविदास आरगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पारंपरिक पद्धतीने कार्यक्रम पार पडला या वेळी इंगावले सरांनी विद्यालयात गणपती बसवण्यामागे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे, त्यांच्यात सांस्कृतिक मूल्ये रुजवणे आणि सांघिक भावना वाढवणे कलागुणांना वाव देणे, नियोजन कौशल्य विकसित करणे, सांस्कृतिक जपवणूक तसेच शिस्त व आदर निर्माण करणे ह्या नैतिक मूल्यांची जोपासना करणे हा उद्देश आहे तसेच गणरायाच्या पवित्र आगमनाने आपल्या घरात सुख, शांती, समृध्दी आणि आनंदाची बरसात होवो. यावेळी नंदु भोसले यांच्या हस्ते भावपूर्ण मंगलमय वातावरण गणेश्याची आरती करण्यात आली. या सर्व कार्यक्रमाची तयारी विशाल जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली कु संचिता काटे, अनुष्का दळे, अर्शिदा शेख, स्तुती साळवे, शुभांगी लोखंडे, ऋतिका कारगुडे, जिक्रा शेख यांनी उत्तम नियोजन केले त्यांना देविदास आरगळेनीं मोलाचे सहकार्य केले सर्व विद्यार्थ्यांनी उत्साहपूर्ण वातावरणात गणपती बाप्पा मोरया! मंगलमूर्ती मोरया! घोषणांनी शालेय परिसर दुमदुमून गेला होता सर्व उपस्थितांचे आभार जोशी सरांनी व्यक्त केले.

## पिंगेवाडीच्या देशपांडे यांना उत्कृष्ट अभियंता पुरस्कार

**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील पिंगेवाडी येथील अजय देशपांडे यांना सन २५/ २६ चा राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत दिला जाणारा उत्कृष्ट अभियंता पुरस्कार नुकताच जाहीर झाला आहे. प्रत्येक वर्षी १५ सप्टेंबरच या दिवशी भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीदिनाचे औचित्य साधून राज्य



शासनाच्या सार्वजनिक विभागामार्फत पुरस्कार जाहीर करण्यात येऊन त्याचे वितरणही याच दिवशी विविध मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत केले जात असल्याने त्यामुळे आज फलटण येथे होणाऱ्या या कार्यक्रमात देशपांडे यांचा सपत्नीक सन्मान सोहळा पार पडत आहे. देशपांडे हे मूळचे शेवगाव तालुक्यातील पिंगेवाडी येथील रहिवाशी असणारे देशपांडे हे सध्या फलटण येथे सार्वजनिक बांधकाम विभागात उपअभियंता म्हणून कार्यरत आहेत.त्यांनी केलेल्या उत्कृष्ट कामाची दखल घेत राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने या बाबतचा अधिकृत निर्णय जाहीर केला असून त्यांनी काही काळ महाबळेश्वर येथे प्रभावी काम केले असून सातारा आणि रत्नागिरी जिल्ह्यासाठी महत्वाच्या आणि सध्या बहुचर्चित असलेल्या महाबळेश्वर येथीलच केबल स्टे ब्रिज च्या उभारणीमध्ये त्यांचे मोठे योगदान असल्यामुळे त्यांच्या या प्रशासकीय आणि तांत्रिक कार्याची योग्य दखल घेतल्याने त्यांना हा विशेष पुरस्कार जाहीर झाला असल्याचे सांगण्यात आले असून त्यांना जाहीर झालेल्या या पुरस्कारामुळे सातारा फलटणचे माजी खासदार रणजीत नाईक निंबाळकर, आमदार सचिन पाटील यांच्यासह शेवगाव तालुक्यातून विविध क्षेत्रातून तसेच पिंगेवाडीसह पंचक्रशीतील ग्रामस्थांतून अभिनंदन होत आहे.

# हिंदू संस्कृतीची वैभवशाली परंपरा जपत गणेशोत्सव साजरा करा : आ. जगताप

## गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना बैठकीत दिल्या सूचना

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** हिंदू संस्कृतीची वैभवशाली परंपरा जपत शास्त्रशुद्ध पद्धतीने शिस्त व सर्व नियमांचे काटेकोर पालन करत गणेशोत्सव साजरा करण्यासाठी आ. संग्राम जगताप यांनी पुढाकार घेतला आहे. गणेशोत्सवाच्या पूर्वसंध्येला नगर शहरातील सार्वजनिक गणेश मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी आ. संग्राम जगताप यांनी सूचना दिल्या. गणेशोत्सवाला भक्ती संस्कृती आणि सामाजिक बांधिलकीची जोड देत नागरिकांना त्रास होणार नाही तसेच कोणत्याही प्रकारची दुर्घटना घडणार नाही. हिंदूंचा हिंदूंनाच त्रास होणार नाही. याची विशेष खबरदारी प्रत्येक मंडळांनी घ्यावी असे आवाहन आ. जगताप यांनी केले.

टिळक रोडवरील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात रविवारी सायंकाळी झालेल्या बैठकीत शहरातील विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते ,महिला सदस्य तसेच बालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी काका ट्रस्टच्यावतीने उपस्थित गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना सार्वजनिक गणेशोत्सव आदर्श मार्गदर्शक पत्रकाचे वितरण करण्यात आले. यावेळी आ. संग्राम जगताप म्हणाले लोकमान्य टिळकांनी सुरू केलेला सार्वजनिक गणेशोत्सव हा हिंदू समाजाचे संघटन करणारा आणि स्वातंत्र्य लढ्याल लढायला बळ देणारा ऐतिहासिक उत्सव आहे. या वैभवशाली परंपरेचा वारसा आज आपण पुढे नेत आहोत. त्यामुळे संस्कृती, हिंदुत्व आणि शास्त्राची परंपरा जपत गणेशोत्सव आदर्श पद्धतीने साजरा करण्याची जबाबदारी आपली आहे. गणेशोत्सवाला कोणत्याही प्रकारचे गालबोट लागणार नाही आणि कोणाच्याही जीवितास धोका होणार नाही. यासाठी मंडळांनी दक्ष रहावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. उपस्थित गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी मनोगत व्यक्त केले. या बैठकीला नगरसेवक विकास जगताप, सागर मुर्तडकर, ड . नितीन खैरे, आदि पदाधिकारी उपस्थित होते. वैभव ढाकणे यांनी सूत्रसंचालन केले. तर गुंडू खताळ यांनी आभार मानले.

# भांडण सोडवायला गेला अन् कोयता-कुऱ्हाडीच्या हल्ल्यात जखमी झाला

## कोयता, कुऱ्हाड, गज, हॉकी स्टिक व दांडक्यांनी मारहाण; नऊ जणांविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** गावातील सुरू असलेले भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या तरुणावर कोयता, कुऱ्हाड, लोखंडी गज, हॉकी स्टिक आणि लाकडी दांडक्यांनी हल्ला केल्याची धक्कादायक घटना चोराचीवाडी येथे घडली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, श्रीगोंदा पोलीस ठाण्यात नऊ जणांविरुद्ध गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडील फिर्यादीनुसार, १० सप्टेंबर रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास गावात भांडण सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर मच्छिंद्र साहेबराव चोर हे पत्नी व मुलासह घटनास्थळी गेले. त्यावेळी अजित पोपट दिंडे, वैभव अरुण काळणे, अक्षय अरुण काळणे, संकेत उत्तम दिंडे, अभिषेक परसराम लांडगे, हनुमंत संपत लांडगे, विकास अंकुश गाडवे, महेश वाघमोडे आणि हर्षद किरण तामणे हे विविध हत्यारे घेऊन आल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, वैभव काळणे व हनुमंत लांडगे यांनी शिवीगाळ करून मारहाण केली. त्यानंतर अजित दिंडे याने हातातील कोयत्याने हल्ला केल्याचा आरोप आहे. भांडण सोडविण्यासाठी पत्नी व मुलगा मध्ये पडले असता त्यांनाही मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

भांडण सोडवायला आलेल्यांनाही मारहाण दरम्यान, आरडाओरड ऐकून सचिन आप्पासाहेब चोर, दिपक आप्पासाहेब चोर व खुलत भाऊजी पूजा दिपक चोर हे घटनास्थळी आले. त्यांनाही लाथाबुक्क्यांनी तसेच लाकडी दांडक्याने मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. शिवीगाळ आणि धमकी दिल्याचेही फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस कॉन्स्टेबल संभाजी उद्धवराव शिंदे करीत आहेत. हल्ल्याच्या या घटनेमुळे चोराचीवाडी परिसरात चर्चेला उधाण आले असून, पोलिसांच्या तपासाकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.मात्र यामध्ये परस्पर विरोधी तक्रारी दाखल असल्याची माहिती मिळाली आहे

# श्रावण सोमवारनिमित्त घोटण ग्रामस्थांची स्वच्छता मोहीम



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अमरापुर :** श्रावण सोमवारनिमित्त शेवगाव तालुक्यातील घोटण येथे आत्माराम स्वामी सेवा संस्थेच्या वतीने स्वच्छता मोहिमेचा उपक्रम राबविण्यात आला. संस्थेतील श्रीकृष्ण मुरलीधर क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थांनी एकत्र येत परिसराची साफसफाई केली.

श्रावण सोमवारच्या पार्श्वभूमीवर धार्मिक स्थळे, सार्वजनिक परिसर आणि नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छतेला विशेष महत्त्व आहे. याच उद्देशाने घोटण येथे ग्रामस्थांनी स्वयंस्फूर्तीने स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला. दरम्यान, शेवगाव शहरात नगरपरिषदेच्या वतीने पहाटे ५ वाजता स्वच्छता मोहिमेला सुरुवात करण्यात आली. नगरपरिषद, क्रीडा संकुल तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून शहरातील स्वच्छता, मैला साफसफाई आणि आरोग्यविषयक कामे करण्यात आली. तसेच नागरिकांच्या गरजेनुसार शववाहिका सेवेसह विविध सार्वजनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात.

स्वच्छता ही केवळ सण-उत्सवापुरती मर्यादित न राहता, ती नियमितपणे जपली जावी, यासाठी नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील ४९२ जणांवर तडीपारीची कारवाई

## शहरात कडक पोलीस बंदोबस्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**अहिल्यानगर :** शहरात गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने पोलीस प्रशासन क्शन मोडवर आले आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील ४९२ जणांवर तडीपारीची कारवाई करण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षक मुमका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्गे, पोलीस उपाधीक्षक डॉ. दिलीप टिपरशे यांच्या मार्गदर्शनाखाली कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य भिंगार, कॅम्प पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांनी ही कारवाई केली आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी ३८३ जणांवर बंधपत्र आणि दारू विक्री करणाऱ्या २१ जणांचे बॉन्ड घेण्यात आले आहेत. याशिवाय गणेशोत्सव काळात सराईत रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर पोलिसांचा वॉच राहणार आहे. त्याचप्रमाणे संवेदनशील ठिकाणी पोलिसांनी कॅमेरे बसविले आहे. त्याचप्रमाणे गणेश उत्सव काळात शहरातील विविध भागात तगाडा पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे. त्यामध्ये १८ पोलीस अधिकारी, १७५ पोलीस अंमलदार, १३५ होमगार्ड यांची नेमणूक करण्यात आली आहे.

# आव्हाणे बु येथे गणेश चतुर्थी निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**ढोरजळगांव :** शेवगांव तालुक्यातील भाविक भक्तांचे श्रद्धास्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री गणपती मंदिर ट्रस्ट आव्हाणे बु।। (गणपतीचे) येथे गणेश चतुर्थी निमित्त सोमवार दि.१४ सप्टेंबर ते शुक्रवार दि.२५ सप्टेंबर या कालावधीत धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

दैनंदिन कार्यक्रमात सकाळी ७ वा. आणि सायं. ७ वा. आरती महाअभिषेक सर्व गणेश भक्तांच्या उपस्थित संपन्न होईल. दररोज सकाळी श्रीगणेश पुराण ग्रंथाचे वाचन प्रकाशदेवा महाजन दररोज सकाळी १० ते ६ श्रीगणेश जप सोमवार दि.१४ सप्टेंबर रोजी दुपारी १२ ते २ फराळ व्यवस्था गणपती मंदिर ट्रस्ट, आव्हाणे यांच्यावतीने करण्यात आली होती. मंगळवार दि.१५ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते १२ ऋषीपंचमीनिमित्त हभप गोरक्ष महाराज मिर्झे, देवटाकळी ता. शेवगाव यांची प्रवचनसेवा होईल. सकाळी ११:०० वा. महाअभिषेक व आरती मालोजीराव भुसारी, अध्यक्ष व मा विश्वस्त गणपती ट्रस्ट, आव्हाणे यांच्यावतीने तर महाप्रसाद व्यवस्था डॉ अशोक जेष्ठराज भालेराव यांच्या तर्फे करण्यात आलेली आहे. दादोबा देव एकतारी भजनी मंडळ, यांचा दैनंदिन आव्हाणे बु।। खु।।, शहापूर, ब-हाणपूर, दिंडेवाडी, चितळी, अमरापूर, ढोरजळगाव, पाडळी, सामनगाव, फलकेवाडी, कर्डिलबा वस्ती, मळेगाव, हनुमानवाडी. यांचा जागराचा कार्यक्रम होईल.शुक्रवार दि.२५ सप्टेंबर रोजी सुधाकर देवा महाजन श्री गणेशपुराण ग्रंथाची संमाप्ती नंतर तिर्थप्रसाद व आरती बाबासाहेब खैरे, दत्ता डुरे यांच्या हस्ते होईल तरी या धार्मिक कार्यक्रमाचा पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घेण्याचे आवाहन अध्यक्ष व मा विश्वस्त मंडळ गणपती मंदिर ट्रस्ट आव्हाणे बु।। यांनी केले आहे.

# पारंपरिक, भक्तिभावाने व शांततेत नियमांचे पालन करून गणेशोत्सव साजरा करा : मुम्मका सदर्शन

## गणेश चतुर्थीनिमित्त धार्मिक व मंगलमय वातावरणात प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** गणेश चतुर्थीनिमित्त अहिल्यानगर शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणपती मंदिरात जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका व त्यांच्या पत्नी गायत्री मुम्मका यांच्या हस्ते श्रींची प्राणप्रतिष्ठा धार्मिक व मंगलमय वातावरणात करण्यात आली. यावेळी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री विशाल गणेश मंदिर देवस्थानच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी देवस्थानचे अध्यक्ष अभय आगरकर, पंडित खरपुडे, अशोक कानडे, पांडुरंग नन्नवरे, ज्ञानेश्वर रासकर, प्राध्यापक माणिकराव विधाते, नितीन पुंड, चंद्रकांत फुलारी, हरिभाऊ फुलसौंदर, विजय कोथिंबीरे, संजय चाफे आदींसह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका म्हणाले की, अहिल्यानगरवासीयांना गणेशोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा. शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणपती मंदिरामध्ये माझ्या हस्ते श्रींची प्राणप्रतिष्ठा भक्तिभावाने व मंगलमय वातावरणात करण्यात आली. या धार्मिक सोहळ्यामुळे मन प्रसन्न झाले.

नगरवासीयांनीही पारंपरिक पद्धतीने, भक्तिभावाने, शांततेत व नियमांचे पालन करून आनंदाने गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांनी केले.

देवस्थानचे अध्यक्ष अभय आगरकर म्हणाले की, जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांच्या हस्ते श्रींची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली आहे. गणेशोत्सवानिमित्त पुढील दहा दिवस मंदिरामध्ये मोठ्या उत्साहात तसेच धार्मिक व सामाजिक वातावरणात विविध



कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यामध्ये गणेशयाग, आरोग्य शिबिर तसेच विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचा समावेश आहे. श्री विशाल गणेश मंदिर हे भाविकांचे श्रद्धास्थान असून, दरवर्षी भाविक मोठ्या संख्येने देवदर्शनासाठी येत असतात. भाविकांना श्रींचे दर्शन सुलभतेने व शिस्तबद्ध पद्धतीने घेता यावे, यासाठी देवस्थानच्या वतीने नियोजनबद्ध व्यवस्था करण्यात आली आहे, असे अभय आगरकर यांनी सांगितले.

# भात पिकांना पावसाची प्रतीक्षा

## ५८ हजार ६५९ हेक्टरवर लागवड पूर्ण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** जिल्ह्यात यंदा नियोजित ६१ हजार १०१ हेक्टरपैकी ५८ हजार ६५९ हेक्टर, म्हणजेच ९६ टक्के क्षेत्रावर भात लागवड पूर्ण झाली आहे. लागवडीनंतर पावसाने काहीशी उघडीप दिल्याने वाढीच्या अवस्थेतील भात पिकांना आता पावसाची प्रतीक्षा आहे.

मावळ, मुळशी, भोर, वेल्हा, खेड, जुन्नर आणि आंबेगाव तालुक्यांत प्रामुख्याने भात लागवड केली जाते. जुलैच्या दुसऱ्या पंधरवड्यात झालेल्या पावसामुळे लागवडीला वेग आला आणि बहुतांश क्षेत्रावरील लागवड वेळेत पूर्ण झाली. ऑगस्टमधील पावसामुळे पिकांना



चांगला आधार मिळाला. सध्या पश्चिम पट्ट्यात तुरळक सरी व शिडकावा होत असून, काही घाटमाथ्यावरील भात खाचरे पाण्याने भरलेली आहेत.सध्या भात पिकांची वाढ समाधानकारक आहे. मात्र, पुढील काळातील पावसाचे प्रमाण व सातत्य उत्पादनासाठी महत्त्वाचे ठरणार आहे. आवश्यकतेनुसार पाऊस झाल्यास उत्पादनाला फायदा होण्याची शक्यता आहे.

**विविध वाणांची लागवड**

जिल्ह्यात आंबेमोहोर, साळ, दोडकी, कोलम आणि इंद्रायणी या पारंपरिक वाणांसह कोकणी, पार्वती, फुले समृद्धी, बासमती, रूपाली, रत्ना, साईराम, सोनम, सुरूची, वैष्णवी आणि तृप्ती या वाणांचीही लागवड केली जाते. मावळ, भोर व मुळशी तालुक्यांत चारसूत्री, अभिनव पट्टा पद्धत, एसआरटी तसेच पारंपरिक पद्धतीने लागवड केली जाते. मजूरटंचाईमुळे भात लागवडीत यांत्रिकीकरणाचा वापरही वाढत आहे.

**दृष्टीक्षेपात**

**पुणे जिल्हयात झालेल्या भात लागवडी, हेक्टरमध्ये :**

| तालुका | सरासरी क्षेत्र | भात लागवड क्षेत्र | टक्के |
|---|---|---|---|
| हवेली | २०६४ | २०७१ | १०० |
| मुळशी | ७६६० | ७५३१ | ९८ |
| भोर | ७५०० | ७५८८ | १०१ |
| मावळ | १२,९५० | ११,८४५ | ९१ |
| वेल्हे | ५०२५ | ४८७२ | ९७ |
| जुन्नर | ११,१२९ | १०,८७३ | ९८ |
| खेड | ७७५० | ७०९४ | ९२ |
| आंबेगाव | ५७३७ | ५७८७ | १०१ |
| दौंड | ० | ३७ | -- |
| एकूण | ६१,१०१ | ५८६५९ | ९८ |

# वनहक्क दाव्यांसाठी १७ सप्टेंबरपासून विशेष मोहीम

## २ ऑक्टोबरपर्यंत कालबद्ध कार्यवाही; प्रलंबित दाव्यांना प्राधान्य

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ अंतर्गत प्रलंबित वैयक्तिक व सामूहिक वनहक्क दाव्यांचा निपटारा करण्यासाठी राज्यात १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत विशेष कालबद्ध वनहक्क मोहीम राबविण्यात येणार आहे. ग्रामस्तरीय समितीपासून जिल्हास्तरीय समितीपर्यंत प्रलंबित दाव्यांची तपासणी करून पात्र दावेदारांना वनहक्क देण्याच्या कार्यवाहीला गती देण्यात येणार आहे.

प्रलंबित वनहक्क दाव्यांचा अनुशेष कमी करणे, निर्णय प्रक्रियेला गती देणे आणि मंजूर वनहक्कधारकांना संबंधित अभिलेख वेळेत उपलब्ध करून देणे हा मोहिमेचा उद्देश आहे. ग्रामस्तरीय वन हक्क समितीने १७ ते १९ सप्टेंबरदरम्यान सर्व वैयक्तिक व सामूहिक दाव्यांची पूर्वतयारी पूर्ण करायची आहे. अर्ज, उपलब्ध पुरावे, संबंधित अभिलेख, दाव्यातील क्षेत्र आणि सीमांकनाची तपासणी करण्यात येणार आहे. आवश्यकतेनुसार महसूल व वन विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या समन्वयातून स्थळपडताळणी व अभिलेखीय पडताळणी करावी लागणार आहे. प्रत्येक दाव्याबाबत मंजुरी, नामंजुरी किंवा आंशिक मंजुरीचा निर्णय विहित पद्धतीने नोंदविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.ग्रामस्तरीय समितीच्या शिफारशीसह अंतिम केलेले दावे ग्राम सभेने ३० सप्टेंबर, १ व २ ऑक्टोबरदरम्यान उपविभागस्तरीय वन हक्क समितीकडे पाठवायचे आहेत. यापूर्वी उपविभागस्तरीय समितीकडे प्राप्त झालेले आणि अंतिम निर्णयाच्या प्रतीक्षेत असलेले दावेही या मोहिमेत प्राधान्याने हाताळण्यात येणार आहेत. अभिलेखीय तपासणी, आवश्यक सुनावणी व पडताळणी करून निर्णय घेण्याच्या सूचना आहेत. जिल्हास्तरीय समितीकडे अंतिम निर्णयासाठी प्रलंबित असलेले दावेही मोहिमेत समाविष्ट करण्यात येणार आहेत. पात्र दावे मंजूर करून वनहक्क प्रदान करण्याची पुढील कार्यवाही तातडीने सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**मंजूर दावेदारांना ७ ई/१२ ई नमुन्यात अभिलेख :**

यापूर्वी वनहक्क मंजूर झालेल्या पात्र वनहक्कधारकांची स्वतंत्र यादी तयार करून त्यांना शासनाने निश्चित केलेल्या ७ ई/१२ ई नमुन्यात वनहक्क अभिलेख किंवा वनपट्टा देण्याची विशेष मोहीम ३० सप्टेंबर ते २ ऑक्टोबरदरम्यान राबविण्यात येणार आहे. यासाठी नावे, मंजूर क्षेत्र, गट किंवा सर्वे क्रमांक आणि अन्य अभिलेखांची अचूकता तपासण्यात येणार आहे.मोहिमेचे जिल्हास्तरीय समन्वय व संनियंत्रण जिल्हाधिकाऱ्यांनी करायचे असून, उपविभागीय अधिकाऱ्यांनी नियमित आढावा घ्यायचा आहे. पात्र दावा केवळ अभिलेखीय किंवा तांत्रिक त्रुटीमुळे प्रलंबित राहू नये अथवा नामंजूर होऊ नये, याची दक्षता घेण्याच्या सूचना शासनाने दिल्या आहेत. मोहिमेपूर्वी जिल्ह्यांनी प्रलंबित दाव्यांची संख्या आणि विविध स्तरांवरील प्रकरणांची माहिती संकलित करायची आहे.

# चार शिक्षकांचा 'प्रेरणादायी शिक्षक' पुरस्काराने सन्मान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर :** समाजात विधायक परिवर्तन घडविण्यात शिक्षकांची भूमिका महत्त्वाची असून, ज्ञानदानासोबत विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, शिस्त आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्याचे कार्य शिक्षक करतात, असे प्रतिपादन राष्ट्रपती शिक्षक पुरस्काराने सन्मानित आदर्श शिक्षक हरिभाऊ पानसरे यांनी केले.



श्रीमंत हलवाई चौक गणेश मित्र मंडळाच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात हरिभाऊ पानसरे, साधना शितोळे, संजय वेदपाठक आणि जयश्री दांडगे यांना 'प्रेरणादायी शिक्षक' पुरस्काराने गौरविण्यात आले. नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे आणि शिरूर शिक्षण प्रसारक मंडळाचे माजी अध्यक्ष सुकुमार बोरा यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.हरिभाऊ पानसरे यांनी विद्यार्थ्यांनी कष्ट, अभ्यास आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांसह शिस्तीचे पालन करावे, नियमित व्यायामाची सवय लावावी, असे आवाहन केले. ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी शिक्षण, संस्कार, शिष्यवृत्ती, मुलींच्या शिक्षणासाठी जनजागृती, शाळा उभारणी आणि सामाजिक उपक्रमांतील योगदानाबद्दल त्यांचा विशेष गौरव करण्यात आला.

साधना शितोळे यांनी शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन असल्याचे सांगितले. संजय वेदपाठक यांनी मोबाईलचा माफक वापर करून बदलत्या तंत्रज्ञानाच्या काळात कृत्रिम बुद्धिमत्तेचा योग्य वापर करण्याचे आवाहन केले. संगणक शिक्षण क्षेत्रात ३५ वर्षांहून अधिक काळ कार्यरत असलेल्या वेदपाठक यांच्या मार्गदर्शनाखाली हजारो विद्यार्थ्यांनी संगणक शिक्षण घेतले आहे.

माजी अध्यक्ष सुकुमार बोरा यांनी शिक्षकांनी कर्तव्यदक्ष, शिस्तबद्ध आणि क्षमाशील राहून विद्यार्थ्यांमध्ये सद्गुणांची पेरणी करावी, असे सांगितले. शिक्षक दिनानिमित्त मंडळाच्या वतीने ३० हून अधिक शिक्षकांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास जनता दलाचे जिल्हाध्यक्ष संजय बारवकर, प्राचार्य डॉ. समीर ओंकार, मंडळाचे अध्यक्ष मयूर काळे, माजी उपनगराध्यक्ष डॉ. वसंत पानसरे, मुख्याध्यापक विनायक म्हसवडे, माजी नगरसेविका राजश्री पानसरे, माजी सभापती प्रदीप बारवकर, राजेंद्र जाधवराव, रणजीत गायकवाड, प्रेम मुसळे, अशोक काळे, सिकंदर मणियार, महेंद्र डेरे, ॲड. उषाताई बढे, डॉ. क्रांती पैठणकर, राहुल निकुंभ, विजय शेजवळ आदी उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. सतीश धुमाळ यांनी केले. सूत्रसंचालन शितल ढवळे यांनी, तर आभार आभा काळे यांनी मानले.

# हिंजवडीतील वाहतूक, पाणी, वीज समस्यांवर उपाययोजनांना वेग

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** हिंजवडी आयटी पार्क व परिसरातील वाहतूक कोंडी, सार्वजनिक वाहतूक, रस्ते, पाणीपुरवठा, वीज आणि कचरा व्यवस्थापनाच्या समस्यांचा जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी विविध विभागांच्या अधिकाऱ्यांसोबत आढावा घेतला. नागरिक व आयटी क्षेत्रातील मनुष्यबळाला आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी समन्वयाने तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आयटी कंपन्यांमधील कर्मचाऱ्यांच्या प्रवासाचा कंपनीनिहाय तपशील संकलित करून पीएमपीएमएल बससेवेचे मार्ग निश्चित करण्यात येणार आहेत. सुमारे २० ते ३० अतिरिक्त बसचे तातडीने नियोजन करण्यात येणार असून, भविष्यातील ५०० नवीन बसमध्ये हिंजवडी व चाकणला प्राधान्य देण्यात येणार आहे. मेट्रो स्थानकांपासून कार्यालये व घरांपर्यंत फिडर बससेवाही सुरू करण्याचे नियोजन आहे.

रस्ते रुंदीकरणासाठी सहा प्रमुख रस्ते निश्चित करण्यात आले असून, आवश्यक भूसंपादन पूर्ण करून १ डिसेंबरपर्यंत काम सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले. वीजखांब व भूमिगत केबल्स स्थलांतरासाठी तातडीने अंदाजपत्रक तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या. सर्व्हिस रोडचे डांबरीकरण १० ते १५ दिवसांत पूर्ण करण्याचेही निर्देश आहेत.

वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी लवळे व महाळुंगे येथील प्रस्तावित उपकेंद्रांच्या कामाला गती देण्यात येणार आहे. पाणीपुरवठा योजनेचे कामही तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

# २१ हजार पाणीपुरींपासून साकारला १३ फूटी गणपती

## गणेश भेळचा अनोखा उपक्रम ;पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** गणेशोत्सव हा महाराष्ट्रातील सर्वांसाठीच मोठ्या आनंदाचा उत्सव. मात्र ज्यांच्या नावातच गणेश आहे अशा गणेश भेळने यंदा अतिशय अनोखा गणेशोत्सव साजरा करण्याचे योजले आहे. २१ हजार पाणीपुरीच्या पुऱ्यांचा वापर करुन १३ फूट उंच आणि १० फूट रुंद असा आगळावेगळा गणपती साकारला आहे. नामदार गोखले पथ म्हणजेच फर्ग्युसन रस्त्यावरील गणेश भेळच्या दालनाबाहेर ही मूर्ती उभारण्यात आली आहे. गणेश भेळचे संस्थापक रमेश गुडमेवार यांच्या हस्ते या मूर्तीचे अनावरण करण्यात आले. यावेळी त्यांच्या पत्नी छाया गुडमेवार, संचालक रुपेश गुडमेवार आणि दिनेश गुडमेवार व अनुष्का गुडमेवार उपस्थित होते.




मूर्तीवरील या पुऱ्या १२ दिवस आहेत तशाच राहाव्यात यासाठी काही विशेष काळजी घेण्यात आली आहे. अशाप्रकारे अनोख्या रितीने गणपती साकारण्याचे यंदाचे चौथे वर्ष असून दरवर्षी वेगळी संकल्पाना घेऊन गणेश भेळ ग्राहकांसमोर येत असते. ही मूर्ती तयार करण्यासाठी मागील २ महिन्यांपासून तयारी सुरू असून या सर्व पुऱ्या आपल्या कारखान्यात तयार करण्यात आल्या आहेत. तर कलाकार प्रशांत साळुंखे यांनी ही मूर्ती प्रत्यक्षात साकारली आहे.

याबाबत सांगताना गणेश भेळचे संचालक रुपेश गुडमेवार म्हणाले, नागरीकांच्या प्रतिसादामुळेच आम्हाला असे काही करण्याची प्रेरणा मिळते. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे पुऱ्या तयार करण्यासाठी वाया जाणाऱ्या/उरलेल्या पिठाचा पुनर्वापर करण्यात आला आहे. तसेच मूर्तीच्या संरचनेसाठी बांबू आणि कागदासारख्या नैसर्गिक व पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करण्यात आला आहे. पुनर्वापर आणि सर्जनशीलतेच्या माध्यमातून पर्यावरणपूरक संदेश देण्याचा हा गणेश भेळचा प्रयत्न आहे.

संचालक दिनेश गुडमेवार म्हणाले, 'गणेश' हे नाव आमच्यासाठी केवळ आमच्या व्यवसायाचं नाव नाही, ते आमच्या आयुष्याशी जोडलेलं एक नातं आहे. आमच्या हातातली पाणीपुरीची प्रत्येक पुरी आमच्यासाठी फक्त एक पुरी नव्हती. त्या प्रत्येक पुरीत आम्हाला 'गणेश' दिसत गेला.

१९७८ मध्ये श्री. रमेश गुडमेवार आणि श्रीमती छाया रमेश गुडमेवार यांनी पुण्यात एका साध्या हातगाडीपासून गणेश भेळची सुरुवात केली. अस्सल चव, उत्तम गुणवत्ता आणि ग्राहकांचे समाधान या मूल्यांवर सुरू झालेला हा छोटासा व्यवसाय आज पुण्याच्या समृद्ध खाद्यसंस्कृतीतील एक लोकप्रिय आणि विश्वासार्ह ब्रँड म्हणून नावारूपाला आला आहे.

आज गणेश भेळच्या ३५ हून अधिक शाखा असून २२ देशांमध्ये हा माल निर्यात केला जातो. आई वडीलांनी सुरू केलेली ही परंपरा आम्ही पुढे नेत असून, आधुनिक व्यवस्थापन, गुणवत्ता आणि नाविन्यपूर्ण विचारांच्या माध्यमातून ब्रँडचा विस्तार करत आहेत. पुढील १२ दिवस म्हणजेच अनंतचतुर्दशीपर्यंत हा गणपती गणेशभक्तांना पाहता येणार आहे. शिवमुद्रा ढोलताशा पथकाने यावेळी अतिशय उत्तम असे वादन करुन कार्यक्रमाची रंगत वाढवली.

## दखल

### बेशिस्त पार्किंगमुळे यवत बाजारपेठेत कोंडी

**दौंड :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर यवत बाजारपेठेत खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी होत असताना बेशिस्त वाहन पार्किंगमुळे वाहतूक कोंडीची समस्या गंभीर झाली आहे. बाजारपेठेत पार्किंगची पुरेशी व्यवस्था नसल्याने चारचाकी व दुचाकी वाहने भर रस्त्यात उभी केली जात आहेत. मुख्य बाजारपेठेतील रस्ता अरुंद असल्याने रस्त्यावर वाहने उभी केल्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. काही वाहनचालक वाहने उभी करून हॅण्डल लॉक करून बाजारात जात असल्याने ती बाजूला करणेही शक्य होत नाही. सायंकाळच्या वेळी वाहनांची वर्दळ वाढत असल्याने पादचारी, महिला व वृद्ध नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी यवत वाहतूक पोलिसांनी बेशिस्त पार्किंग करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करावी, तसेच बाजारपेठेत वाहतूक व्यवस्थेचे नियोजन करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### वळती, गांजवेवाडी परीसरात चोरीच्या घटना ; रोख रक्कम, मंगळसूत्र चोरीला



**निरगुडसर :** आंबेगाव तालुक्यातील वळती, गांजवेवाडी परिसरात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून, एका रात्रीत अनेक ठिकाणी चोरी आणि चोरीचे प्रयत्न झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शुक्रवार, दि. ११ सप्टेंबरच्या रात्री चोरट्यांनी गांजवेवाडीतील बोऱ्हाडे मळा, जाधव मळा आणि भोकरवस्ती परिसराला लक्ष्य केले.

गांजवेवाडी येथील धनंजय तुकाराम ठाकूर यांच्या बंद घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी घरात प्रवेश केला. घरातील सुमारे २८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र आणि १५ हजार रुपयांची रोख रक्कम चोरून नेल्याचे समोर आले आहे. त्यानंतर बोऱ्हाडे मळ्यातील भगवान बोऱ्हाडे यांच्या घरात प्रवेश करून कपाट उघडण्यात आले. तेथून नवीन कपडे चोरून नेण्यात आल्याची माहिती आहे.यानंतर चोरट्यांनी भोकरवस्तीतील रामदास भोर यांच्या घरात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. मात्र, घरातील व्यक्तींना चाहूल लागल्याने त्या जाग्या झाल्या. त्यामुळे चोरट्यांनी तेथून पळ काढला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने घटनास्थळी पाहणी केली. मंचर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांनीही घटनास्थळी भेट देऊन माहिती घेतली. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. एका रात्रीत अनेक ठिकाणी चोरीचे प्रकार घडल्याने परिसरात पोलिसांची गस्त वाढवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### पारंपरिक वाद्यांच्या गजरात आळंदीत गणरायाचे आगमन




**आळंदी :** गणेश चतुर्थीनिमित्त आळंदी शहरात सार्वजनिक गणेश मंडळांसह घरगुती गणरायाचे पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि हरिनामाच्या जयघोषात उत्साहात स्वागत करण्यात आले. 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने आळंदी नगरी भक्तिमय झाली. श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरात गणेश चतुर्थीनिमित्त गणरायाचे विधिवत पूजन करून गणेशोत्सवाला प्रारंभ करण्यात आला. प्रमुख विश्वस्त भावार्थ रामचंद्र देखणे यांच्या हस्ते गणेशपूजा करण्यात आली. गणेशोत्सवानिमित्त मंदिरात दररोज हरिकीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेतही गणेशमूर्तीची विधिवत स्थापना करण्यात आली. संस्थेचे सचिव अजित वडगावकर यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. गणरायाच्या आगमनाने शिक्षण संस्थेच्या परिसरातही उत्साहाचे आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले.

### भीषण अपघात ५८ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू, एक जखमी



**वळती :** आंबेगाव तालुक्यातील जाधववाडी येथे अष्टविनायक महामार्गावर राज हॉटेलसमोर गुरुवारी (दि. ११) दुपारी साडेतीनच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात रमेश भाऊ जाधव (वय ५८) यांचा मृत्यू झाला, तर तुषार सुरेश जाधव (वय ३२) हे जखमी झाले आहेत. फिर्यादीतील माहितीनुसार, रमेश जाधव व तुषार जाधव हे ज्युपिटर दुचाकीवरून जात असताना रस्ता ओलांडत होते. यावेळी स्विफ्ट डिझायर कारने त्यांच्या दुचाकीला धडक दिल्याचा आरोप आहे. या अपघातात रमेश जाधव गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने उपजिल्हा रुग्णालय, मंचर येथे दाखल करण्यात आले; मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

# 'दगडूशेठ' चे गणपती बाप्पा मयूर रथातून आगमन मिरवणुकीने प्रेम मंदिरात विराजमान

## श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट ; गणेशोत्सव २०२६

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** गणपती बाप्पा मोरया... मंगलमूर्ती मोरया... च्या जयघोषात श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरापासून फुलांनी सजविलेल्या मयूर रथातून निघालेल्या दिमाखदार आगमन मिरवणुकीने वाजत गाजत वृंदावन मधील प्रेम मंदिराच्या जय गणेश प्रांगण येथे साकारलेल्या प्रतिकृतीमध्ये 'दगडूशेठ' चे गणपती बाप्पा विराजमान झाले. श्रीं चा हा नयनरम्य आगमन सोहळा पाहण्याकरता हजारो भाविकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ च्यावतीने ट्रस्टच्या १३४ व्या वर्षानिमित्त आयोजित उत्सवाचा प्रारंभ हजारो भक्तांच्या साक्षीने झाला. गणेश चतुर्थीला सकाळी ११ वाजून ११ मिनिटांनी उत्सवाची पारंपरिक जागा असलेल्या जय गणेश प्रांगण येथे उत्तरप्रदेश वृंदावन येथील श्री राधावल्लभ मंदिराचे १८ वे तिलकायत अधिकारी श्रीहित मोहितमराल गोस्वामीजी महाराज यांच्या हस्ते श्रीं ची प्राणप्रतिष्ठापना झाली.यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, उपाध्यक्ष डॉ. रामचंद्र उर्फ बाळासाहेब परांजपे, उपाध्यक्ष माणिक चव्हाण, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस व आमदार हेमंत रासने, सहचिटणीस अमोल केदारी, उत्सव प्रमुख अक्षय गोडसे, विश्वस्त रोहित लोंढे, पराग वांबुरे, राजेंद्र गावडे, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण यांसह सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

सकाळी ८.३० वाजता मुख्य मंदिरापासून फुलांनी सजविलेल्या मयूर रथातून श्रीं ची आगमन मिरवणूक काढण्यात आली. यावेळी गंधाक्ष ढोल ताशा पथक, मयूर बँड, प्रभात बँड आणि दरबार बँड मिरवणुकीत सहभागी झाले होते. मुख्य मंदिर, अप्पा बळवंत चौक, शनिपार चौक, टिळक पुतळा मंडईमार्गे उत्सव मंडपात मिरवणूक आली.

**ऋषिपंचमीनिमित्त ३५ हजार महिलांचे अर्थवशीर्ष पठण :**

मंगळवार, दिनांक १५ सप्टेंबर रोजी पहाटे ६ वाजता ऋषिपंचमीनिमित्त दरवर्षीप्रमाणे ३५ हजार महिला सामुदायिकरीत्या अर्थवशीर्ष पठण करणार आहेत. यावेळी पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, विभागीय आयुक्त शीतल तेली - उगले उपस्थित राहणार आहेत. तसेच रात्री १० ते १२ वाजेपर्यंत हरी जागर च्या माध्यमातून महाराष्ट्रातील वारकरी बंधू वारकरी गजर करीत गणरायाचरणी सेवा अर्पण करणार आहेत.



श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ च्यावतीने ट्रस्टच्या १३४ व्या वर्षानिमित्त आयोजित उत्सवाचा प्रारंभ हजारो भक्तांच्या साक्षीने झाला. मयूर रथातून श्रीं ची आगमन मिरवणूक काढण्यात आली.

# द•ख•ल

## गणपतीच्या काळात सिंगल-फेज विजेचे भारनियमन रद्द करा

**हातगाव :** गणपतीचा उत्सव हा सार्वजनिक उत्सव असून या उत्सवामध्ये सर्व जाती - धर्मांचे नागरिक मोठ्या उमेदीने एकत्र येऊन गणपती उत्सव साजरा करत असतात. मात्र वीज महावितरण कंपनीकडून दिवसातल्या २४ तासांमध्ये कोणत्यातरी वेळी ३ तासाचे



भारनियमन विभागून दिले जात असून त्याचा भारनियमन काळात परिणाम होऊ नये म्हणून गणपती बसल्यापासून ते विसर्जनापर्यंत सध्या वीज महावितरण कंपनीकडून सुरू असलेले ३ तासाचे भारनियमन रद्द करण्यात यावे. अशी मागणी भा.ज. प. चे जिल्हा कार्यकारिणी सदस्य रावसाहेब निकाळजे यांनी वीज महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे केली आहे. या बाबत शेवगाव येथील महावितरणचे ग्रामीण विभागाचे उपकार्यकारी अधिकारी बनसोडे तसेच चापडगाव येथील वीज महावितरण कंपनीचे शाखा क्र.१ चे कनिष्ठ अभियंता सचिन घोडके व शाखा क्र.२ चे कनिष्ठ अभियंता प्रशांत थोरात यांच्याशी संपर्क साधून सविस्तर माहिती देण्यात आली. गणपतीचा सार्वजनिक उत्सव लक्षात घेऊन सदरचे भारनियमन रद्द करण्याची मागणी केली असून प्रत्येक वर्षी प्रत्येक गावात सर्वधर्मीय बांधव या निमित्ताने एकत्र येत एकोपा निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. विस्ताराने मोठ्या असलेल्या तालुक्यात सार्वजनिक मंडळासह घरगुती गणपती मोठ्या संख्येने बसवले जात असल्याने आपले स्तरावरून तालुक्यात गेली अनेक महिन्यापासून विजमहावितरण कंपनीने सब स्टेशन वाईज २ किंवा ३ तासांचे सिंगल फेजला भारनियमन वेग - वेगळ्या वेळासाठी दिलेले जात आहे. ते भारनियमन गणपती विसर्जन होईपर्यंत तालुक्यात कुठेच करू नये व या काळात काळात पूर्ण दाबाने वीजपुरवठा करण्यात यावा. असे निवेदनात निकाळजे यांनी म्हटले आहे.

## श्रीगोंदा लॉ कॉलेजमध्ये 'एलएलएम'चा शुभारंभ

**श्रीगोंदा :** तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठान संचलित श्री शिवाजीराव नागवडे लॉ कॉलेजमध्ये नवीन एलएलएम अभ्यासक्रमाचा शुभारंभ तसेच एलएलबी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा इंडक्शन कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. तालुक्याच्या ठिकाणी उच्च कायदे शिक्षणाची संधी उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. प्राचार्या डॉ. अंजुला एस. चौबे यांनी प्रास्ताविक केले. अध्यक्षीय भाषणात राजेंद्रदादा नागवडे यांनी विद्यार्थ्यांनी उपलब्ध शैक्षणिक संधींचा पुरेपूर उपयोग करून मेहनत, सातत्य आणि जिद्दीच्या जोरावर उज्ज्वल करिअर घडवावे, असे आवाहन केले. कार्यक्रमास श्रीगोंदा बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. जयंत शिंदे, ॲड. अशोक रोडे, ॲड. सुनील बोस, ॲड. अशोक वाळुंज, ॲड. झराड, ॲड. संग्राम देशमुख, संस्थेचे इन्स्पेक्टर सूर्यभान गोलांडे, एसजीपी कॉलेजचे प्राचार्य अमोल नागवडे यांच्यासह प्रा. पी. जे. फाटे, डॉ. दिपाली जावळे, प्रा. रुपाली गोळे, ग्रंथपाल संदीप अवचिते, अर्पित रनसिंग, क्षितिज शितोळे, आदित्य दानवे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. रुपाली गोळे यांनी केले, तर आभार ॲड. अशोक रोडे यांनी मानले. नवीन एलएलएम अभ्यासक्रमाच्या प्रारंभामुळे श्री शिवाजीराव नागवडे लॉ कॉलेजच्या शैक्षणिक वाटचालीत महत्त्वाची भर पडली असून, विद्यार्थ्यांसाठी उच्च कायदे शिक्षणासह न्यायिक सेवा व स्पर्धा परीक्षांच्या तयारीचे नवे दालन खुले झाले आहे.

## तिखोल रस्त्याच्या प्रश्नावर ग्रामस्थांचे उपोषणाचे हत्यार

**टाकळी ढोकेश्वर :** तिखोल येथील गट क्रमांक १९३ मधून गट क्रमांक १९४, १९५, १९९ व १९७ कडे पूर्वेकडे जाणारा पूर्वीचा रस्ता खुला करून देण्याच्या मागणीवरून ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. या प्रकरणात मंडळ अधिकारी, कान्हूर पठार यांनी वस्तुस्थितीविरुद्ध अहवाल दिल्याचा आरोप करत संबंधित अधिकाऱ्याची चौकशी करून दोष आढळल्यास कायदेशीर व प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणी माजी सरपंच अनिल तांबडे व इतर ग्रामस्थांनी तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे केली आहे.गट क्रमांक १९३ मधील रस्त्याला अडथळा निर्माण झाल्याने तांबडे, मंचरे वस्ती तसेच संबंधित शेतजमिनींकडे ये-जा करण्यासाठी अडचणी निर्माण झाल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. यापूर्वी तहसीलदारांनी दिलेल्या आदेशानुसार रस्ता खुला करण्याबाबत कार्यवाही होणे अपेक्षित असतानाच मंडळ अधिकाऱ्यांनी २४ ऑगस्ट २०२६ रोजी दिलेल्या अहवालात ओढ्याच्या बाजूने अथवा कडेने पर्यायी रस्ता उपलब्ध असल्याचे नमूद केल्याचा ग्रामस्थांचा आक्षेप आहे.प्रत्यक्षात या ठिकाणी पूर्वीपासून असा कोणताही रस्ता अस्तित्वात नव्हता आणि आजही नसल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. सर्कलला दुसरा रस्ता दिसला कसा? तो रस्ता असल्याचे प्रशासनाने सिद्ध करून दाखवावे; अन्यथा वस्तुस्थितीविरुद्ध अहवाल देणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.प्रशासनाने तातडीने चौकशी करून लेखी स्वरूपात कार्यवाहीची माहिती न दिल्यास १५ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता तहसीलदार कार्यालयाच्या गेटसमोर शांततामय उपोषण करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. निवेदनावर अनिल तांबडे,रावसाहेब मंचरे,किसन तांबडे, बाजीराव ठाणगे, सखाराम मंचरे, योगेश तांबडे, भाऊसाहेब मंचरे व आनंदा तांबडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## क्रिकेट स्पर्धेत वराळ युवा मंच टाकळी ढोकेश्वर संघाचा प्रथम क्रमांक



**निघोज :** निघोज येथील क्रिकेट स्पर्धेत रावसाहेब वराळ युवा मंच टाकळी ढोकेश्वर संघाचा प्रथम क्रमांक. कु.विश्वा विलास वराळ पाटील यांच्या ५ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने धर्मरक्षक प्रतिष्ठाण आयोजित भव्य क्रिकेट स्पर्धेला मोठा प्रतिसाद मिळाला असून दोन दिवसीय या स्पर्धेत पारनेर व जुन्नर तसेच शिरुर तालुक्यातील क्रिकेट संघ सहभागी झाले होते. धर्मरक्षक प्रतिष्ठानचे अध्यक्ष पैलवान सुभाष वराळ व वेताळबाबा स्टेडियमचे सर्वेसर्वा मेजर विलास वराळ व त्यांच्या सहकाऱ्यांनी या क्रिकेट स्पर्धा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. एकूण १६ संघांनी स्पर्धेत नोंदविला होता विजेत्या संघांना पारितोषिक वितरण सोहळा रविवारी १३ रोजी युवासेना अहिल्यानगर जिल्हाप्रमुख मा.नितीन शेळके,उपसरपंच रामा तराळ, पंचायत समिती सदस्य अमोल साळवे,उद्योजक कैलास कोठावळे, उद्योजक अमोल उगले,अमोल आल्हाट, पारनेर तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष भास्करराव कवाद , पारनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष बाबाजी वाघमारे, शिवसेना उपतालुकाप्रमुख देवराम लामखडे,देवराम वराळ,माऊली ग्रुप कामोठे उद्योजक माऊलीशेठ मोरे व सर्व मित्रपरिवार,आसिफभाई इनामदार,ऋतिक पठारे, स्वप्निल कारखिले,रा.काँ.माहिती व तंत्रज्ञान विभाग महाराष्ट्र राज्य प्रमुख जितेश सरडे,मळगंगा कन्स्ट्रक्शनचे संचालक सागर शेठ रसाळ तसेच शिवसेना-युवासेना तसेच धर्मरक्षक प्रतिष्ठाण परिवारातील सर्व सदस्य व ग्रामस्थांच्या उपस्थितीत पार पडला.

# श्रीगोंद्यात बुधवारी मनोज जरांगे पाटलांचा मुक्काम!

## मराठा आंदोलकांच्या स्वागतासाठी श्रीगोंदाकर सज्ज

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईच्या दिशेने निघालेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाचा बुधवारी (दि. १६) श्रीगोंद्यात मुक्काम होणार असल्याने शहरासह तालुक्यात आंदोलनाची जोरदार तयारी सुरू झाली आहे. जरांगे पाटील यांच्यासोबत मोठ्या संख्येने मराठा आंदोलक श्रीगोंद्यात दाखल होण्याची शक्यता असल्याने प्रशासन आणि पोलिस यंत्रणा पूर्णपणे अलर्ट झाली आहे.

आंदोलकांच्या मुक्कामासाठी शहर व परिसरातील मंगल कार्यालये, हॉटेल्स तसेच ओपन गार्डनची व्यवस्था करण्यात येत असून, अनेक मराठा समर्थकांकडून स्वयंस्फूर्तीने आंदोलकांच्या निवासाची तसेच भोजनाची तयारी केली जात आहे. त्यामुळे बुधवारी श्रीगोंदा शहराला मराठा आंदोलनाचे मोठे केंद्राचे स्वरूप येण्याची शक्यता आहे.बुधवारचा दिवस श्रीगोंद्यासाठी राजकीय आणि सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचा ठरणार असून, जरांगे पाटील यांच्या मुक्कामाकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

**पोलिस यंत्रणा पूर्णपणे अलर्ट**

मोठ्या प्रमाणावर आंदोलक श्रीगोंद्यात येणार असल्याने कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी अहिल्यानगरचे पोलिस अधीक्षक, अप्पर पोलिस अधीक्षक, उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्यासह चार अधिकारी तसेच ५० वरिष्ठ अधिकारी आणि ४०० पेक्षा अधिक पोलिस कर्मचारी बंदोबस्तासाठी तैनात करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर एसआरपीएफची एक तुकडी देखील बंदोबस्तासाठी तैनात राहणार आहे.आंदोलन शांततेत पार पडावे, वाहतूक कोंडी होऊ नये आणि नागरिकांना कोणताही



त्रास होऊ नये, यासाठी पोलिसांकडून मार्ग, पार्किंग, वाहतूक नियंत्रण आणि गर्दी व्यवस्थापनाचे नियोजन करण्यात येत आहे.

**गावागावातून मदतीचा हात**

जरांगे पाटील यांच्या मुक्कामाच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील विविध गावांमधून मराठा समर्थक श्रीगोंद्याकडे येणाऱ्या आंदोलकांसाठी जेवण, पिण्याचे पाणी, निवास आणि अन्य आवश्यक सुविधांची व्यवस्था करण्यासाठी पुढे सरसावले आहेत. काही ठिकाणी सामूहिक स्वयंपाकाची तयारी सुरू असून, मुक्कामाच्या ठिकाणी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी स्वयंसेवकांची पथके कार्यरत झाली आहेत.

**श्रीगोंद्यात बुधवारी शक्तिप्रदर्शनाची शक्यता**

मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीमुळे श्रीगोंद्यात मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे बुधवारी दिवसभर शहरात मराठा आंदोलनाची जोरदार चर्चा आणि हालचाली पाहायला मिळणार आहेत. आंदोलकांच्या स्वागतासाठी विविध ठिकाणी तयारी सुरू असून, मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, आंदोलन शांततेत पार पाडण्याचे आवाहन प्रशासन आणि पोलिसांकडून करण्यात येत असून, कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पतसंस्थेच्या दारातच खातेदारांचा ठिय्या

## माऊली पतसंस्थेकडून ठेवीदारांना लाखो रुपयांचा चुना!

**प्रतिनिधी| राष्ट्र सह्याद्री**

**शिराळ चिचोंडी :** पाथर्डी व नेवासा तालुक्यातील अनेक सर्वसामान्य शेतकऱ्यांना भावनिक करून त्यांच्याकडून सोनेतारण मुदत ठेवीच्या माध्यमातून मोठे व्याजदर देण्याच्या निमित्ताने शेकडो लोकांना फसवून खातेदारांच्या ठेवीची व्याजासह रक्कम तसेच तारण ठेवलेले सोने आणि दैनंदिन बचत केलेले पैसे न देणाऱ्या श्री माऊली पतसंस्थेच्या चेअरमनसह संचालक मंडळावर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असून चिचोंडी शिराळ तालुका पाथर्डी येथील शाखेच्या कार्यालयासमोर संबंधित खातेदारांनी रविवारी सकाळी ठिय्या आंदोलन करत खातेदारांची फसवणूक करणाऱ्या चेअरमन व संचालक मंडळाला तात्काळ अटक




करावी आणि आम्ही ठेवलेली ठेव आणि तारण ठेवलेले सोने तात्काळ आम्हाला मिळावे या मागणीसाठी संतप्त भावना व्यक्त केल्या. मोहोजबुद्रुक तालुका पाथर्डी गावचा सुनील शिरसाठ याने श्री माऊली पतसंस्थेच्या माध्यमातून पाथर्डी नेवासा तालुक्यात शाखा स्थापन केल्या आणि या शाखेच्या माध्यमातून सर्वसामान्य व्यक्ती छोटे-मोठे व्यवसायिक यांना आपल्या पतसंस्थेत ठेवी ठेवण्याचे आणि सोनेतारण करण्याचे व दैनंदिन बचत करण्याचे आवाहन केले. शिरसाठ याने अनेक संत महंतांच्या सानिध्यात असल्याचे भासवून सर्वसामान्यांना भावनिक करून त्यांची सपशेल फसवणूक केली आहे. खातेदार ठेवीदार यांचे पैसे वेळेवर परत न देता त्यांना उडवा उडवीचे उत्तरे दिली जाऊ लागली. चिचोंडी तिसगावसह व इतर शाखांना आता टाळे लावून या पतसंस्थेचे चेअरमन संचालक व कर्मचारी देखील पसार झाले असल्याची चर्चा आहे. त्यामुळे ठेवीदार दैनंदिन बचत करणारे खातेदार हातबल झाले आहेत. चिचोंडी शिराळ येथे शीला पालवे अंबिका दानवे सुनिता जाधव जिजाबाई जराड शितल पोटे शितल खाडे हिराबाई दानवे शोभा दानवे आशा दानवे अलका गरुड रुक्मिणी गरुड या महिलांसह दीपक जराड संदीप दानवे अक्षय डोळसे सुधाकर जराड आसाराम आव्हाड रमेश जराड कैलास जराड भगवान पालवे मीराबाई पालवे डॉक्टर घोरपडे राजु गरुड शुभांगी गरुड दीपक दानवे मंदाबाई पाथरकर सुनील गव्हाणे अशोक पोटे सुनील गरुड चंदू तुपे देवराम डोळसे हिराबाई दानवे यांच्यासह अनेक खातेदार या आंदोलन प्रसंगी उपस्थित होते.

# गणेशाच्या जयघोषाने राशीनची बाजारपेठ दुमदुमली



**प्रतिनिधी| राष्ट्र सह्याद्री**

**राशीन :** गणपती बाप्पा मोरया... मंगलमूर्ती मोरया! या जयघोषाने राशीन नगरी भक्तिमय झाली आहे. लहान मुलांची किलबिल, ढोल-ताशांचा गजर आणि उत्साहात गणेशमूर्ती घेऊन जाणारे छोटे-मोठे मंडळे यामुळे सर्वत्र गणेशोत्सवाचा जल्लोष पाहायला मिळत आहे.

राशीन येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील चिंचेच्या झाडाखालील व्यापारी पेठ गणरायाच्या आगमनाने अक्षरशः फुलून गेली आहे. विविध आकर्षक गणेशमूर्ती, रंगीबेरंगी फुले, हार-तुरे, मखर, तोरणे, सजावटीचे साहित्य, विद्युत रोषणाई व पूजासाहित्य खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी होत आहे. ग्राहकांची वाढलेली वर्दळ पाहता दुकानदारांच्या विक्रीलाही चांगला प्रतिसाद मिळत आहे.

गणेशोत्सवाच्या निमित्ताने मिठाईच्या दुकानांमध्येही उत्साहाचे वातावरण असून मोदक, पेढे, लाडू आणि विविध मिठाईच्या खरेदीसाठी नागरिकांची गर्दी होत आहे. त्यामुळे गणेशोत्सवाने बाजारपेठेला आर्थिक चालना मिळाली आहे. गणरायाच्या आगमनाने राशीनमध्ये भक्ती, उत्साह आणि बाजारपेठेतील चैतन्याचा त्रिवेणी संगम पाहायला मिळत आहे.

# कुकडी डाव्या कालव्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी संघटित प्रयत्नांची गरज : शेलार

## डिंभे-माणिकडोह बोगद्यासाठी लंके-दाते यांचा सक्रिय पाठिंबा

**प्रतिनिधी| राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** कुकडी प्रकल्पातील डाव्या कालवा लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा असलेला डिंभे-माणिकडोह बोगदा पूर्ण करण्यासाठी खासदार निलेश लंके व आमदार काशिनाथ दाते यांनी सक्रिय पाठिंबा दर्शविला आहे. बोगदा होण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासन दोन्ही लोकप्रतिनिधींनी दिल्याची माहिती घनश्याम शेलार यांनी दिली.



कुकडी डाव्या कालव्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी तसेच जुन्नर, पारनेर, श्रीगोंदा, कर्जत व करमाळा या पाच तालुक्यांतील शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे पाणी मिळावे, यासाठी अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रयत्नातून डिंभे-माणिकडोह बोगद्याला मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली आहे. मात्र, आंबेगावचे आमदार दिलीप वळसे पाटील यांनी या कामास विरोध दर्शवत मंजुरीला स्थगिती देण्याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे केली असल्याचा आरोप शेलार यांनी केला.

वळसे पाटील यांच्या भूमिकेचा निषेध करण्यासाठी शेलार यांनी १२ सप्टेंबर रोजी पत्रकार परिषद घेतली होती. या वेळी कुकडी डाव्या कालव्याच्या लाभक्षेत्रातील सर्व लोकप्रतिनिधींनी एकत्रित येऊन प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज व्यक्त केली होती. तसेच पाचही तालुक्यांतील आमदार व खासदारांच्या भेटी घेऊन बोगद्याच्या कामासाठी संघटितपणे लढा उभारण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला होता.

त्याचाच भाग म्हणून शेलार यांनी सोमवारी खासदार निलेश लंके व आमदार काशिनाथ दाते यांची पारनेर येथे भेट घेतली. या भेटीत दोन्ही लोकप्रतिनिधींनी डिंभे-माणिकडोह बोगदा झालाच पाहिजे, अशी भूमिका स्पष्ट केली. कुकडीच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे पाणी मिळण्यासाठी बोगद्याचे काम महत्त्वाचे असून, ते पूर्ण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासन लंके व दाते यांनी दिल्याचे शेलार यांनी सांगितले.

# नवजीवन विद्यालयात लोकनेते मारुतराव घुले पाटील जयंती उत्साहात

**प्रतिनिधी| राष्ट्र सह्याद्री**

**एरंडगाव :** लोकनेते मारुतराव घुले पाटील यांनी आपल्या दूरदृष्टीतून परिसराच्या सर्वांगीण विकासाचा पाया रचत शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात भरीव योगदान दिले. त्यांच्या कार्यामुळे हा परिसर समृद्ध झाला, असे प्रतिपादन ह.भ.प. शिवशाहीर कल्याण महाराज काळे यांनी केले.



शेवगाव तालुक्यातील नवजीवन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, दहिगाव-ने येथे लोकनेते मारुतराव घुले पाटील यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख व्याख्याते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.ना. सौ. राजश्रीताई घुले पाटील होत्या. प्रमुख उपस्थिती शेवगाव पंचायत समितीचे सभापती डॉ. क्षितीज घुले पाटील यांची होती. ह.भ.प. कल्याण महाराज काळे यांनी आपल्या मधुर वाणीतून लोकनेते मारुतराव घुले पाटील यांच्या कार्याचा गुणगौरव केला. तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शौर्याचा पोवाडा सादर करून विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. डॉ. क्षितीज घुले पाटील यांनी मनोगतात सांगितले की, स्व. मालकांनी ग्रामीण भागात शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. त्याच शैक्षणिक कार्याचा आज बदलत्या काळानुसार विस्तार होत असून, जनता शिक्षण प्रसारक मंडळाच्या शैक्षणिक संकुलात विविध अभ्यासक्रमांसह संगणक क्षेत्रातील विविध अभ्यासक्रम ग्रामीण भागातील विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी उपलब्ध झाले आहेत. आमदार डॉ. नरेंद्रजी घुले पाटील व आमदार चंद्रशेखर घुले पाटील यांच्या मार्गदर्शनातून हे शैक्षणिक कार्य पुढे सुरू आहे. अध्यक्षीय भाषणात सौ. राजश्रीताई घुले पाटील यांनी लोकनेते मारुतराव घुले पाटील यांच्या दूरदृष्टीचा उल्लेख करत त्यांच्या विचारातून परिसराचा झालेला शैक्षणिक व सामाजिक कायापालट अधोरेखित केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. बाळासाहेब मंडलिक यांनी केले. पाहुण्यांचे स्वागत प्राचार्य प्रा. डॉ. रमेश खैरे यांनी केले. आभार पर्यवेक्षक मच्छिंद्र पानकर यांनी मानले, तर सूत्रसंचालन प्रा. मकरंद बारगुजे यांनी केले.

यावेळी भारुड सम्राट ह.भ.प. हमीद सय्यद, सुधाकर काळे, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आरोग्य अधिकारी डॉ. श्रुती मॅडम, ज्येष्ठ नागरिक शब्बीरभाई, सुभाष पवार, उपसरपंच सूर्यकांत पाऊलबुद्धे, बाळासाहेब मरकड, सुरेश घाणमोडे, विजय घुले, विद्यालयाचे उपप्राचार्य जयराम नागरे, महाविद्यालयाचे प्राचार्य शरद कोलते यांच्यासह विद्यालयातील शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विकासासाठी राजकारण बाजूला ठेवून काम करणार : आ. दाते

## मतांची संख्या नव्हे, विकासाची बांधिलकी महत्त्वाची

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील नांदूर पठार परिसरातील विविध विकासकामांना गती देत पानसरेवस्ती रस्ता व कोठारवस्ती रस्ता या प्रत्येकी १० लाख रुपये खर्चाच्या, एकूण २० लाख रुपयांच्या विकासकामांचा भूमिपूजन समारंभ आ. काशिनाथ दाते यांच्या उपस्थित पार पडला. या रस्त्यांमुळे परिसरातील नागरिकांची दळणवळणाची अडचण दूर होऊन शेतकरी व ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळणार आहे.

> आ. काशिनाथ दाते माध्यमातून नांदूर पठार परिसरातील विकासकामांना मिळणारी गती निश्चितच समाधानकारक आहे. विशेष म्हणजे, विकासकामे करताना निवडणुकीतील मतांचा विचार न करता संपूर्ण गावाकडे समानतेच्या भावनेने पाहण्याची त्यांची भूमिका कौतुकास्पद आहे. आ. दाते यांनी प्रत्येकाशी आपुलकीने आणि आदराने संवाद साधत दिलेली वागणूक मनाला भावणारी आहे. सामान्य कार्यकर्त्यालाही सन्मानाची वागणूक देणारे आणि विकासाच्या प्रश्नांवर सकारात्मक भूमिका घेणारे नेतृत्व म्हणून दाते सरांविषयी आमच्या मनात निश्चितच आदर आणि समाधान आहे.
>
> **राहुल राजदेव, ग्रामस्थ**

यावेळी बोलताना आ. काशिनाथ दाते यांनी नांदूर पठारसह पठार भागातील विविध गावांचा वर्षानुवर्षे प्रलंबित असलेला शेतीच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या प्रयत्नांची माहिती ग्रामस्थांना दिली. शेतीच्या पाण्याचा प्रश्न हा या भागातील शेतकऱ्यांच्या जीवनाशी निगडित असल्याने त्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, विधानसभा निवडणुकीत नांदूर पठार गावातून आपल्याला अपेक्षेपेक्षा कमी मतदान झाले असतानाही गावाच्या विकासात कोणताही भेदभाव केला जाणार नाही, असे स्पष्ट करत आ. दाते मी ज्या लोकांच्या मतांमुळे निवडून



आलो त्यांचाच नव्हे, तर आता संपूर्ण मतदारसंघातील जनतेचा प्रतिनिधी आहे.

विकासकाम करताना मी राजकारण कधी डोक्यात ठेवत नाही, अशी स्पष्ट भूमिका मांडली. निवडणुकीतील मतांचा हिशेब न करता जनतेच्या गरजा आणि गावांच्या विकासाला प्राधान्य देणे हेच आपले ध्येय असल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रसंगी देवराम मगर, धनंजय निमसे, गोपीचंद घुले, वंदना घोलप, राजेंद्र उबाळे, एल. के. झावरे गुरुजी, बी. डी. झावरे सर, घनदाट मामा पतसंस्थेचे अध्यक्ष मोहनदादा घनदाट, पतसंस्थेचे संचालक संजय घोलप, अनिकेत देशमाने, अरुण देवराम आग्रे, अरुण राजदेव, माजी सरपंच हरिभाऊ आहेर, विनायक देशमाने, सचिन आग्रे, जयसिंग देशमाने, राहुल राजदेव, प्रकाश राजदेव, हरिभाऊ पानसरे यांच्यासह परिसरातील विविध गावांचे पदाधिकारी, मुंबईकर मंडळी आणि स्थानिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

मंगळवार दि.१५ सप्टेंबर २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## चंद्रकोरीच्या सान्निध्यात शुक्राचे तेजस्वी दर्शन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**झरेकाठी** : १४ सप्टेंबर रोजी सायंकाळी पश्चिम-नैऋत्य दिशेच्या आकाशात चंद्रकोरीच्या अगदी जवळ तेजस्वी शुक्र ग्रहाचे मनोहारी दर्शन झाले. चंद्रकोर आणि शुक्राच्या या विलक्षण जवळिकीने आकाशप्रेमींचे लक्ष वेधून घेतले. खगोलशास्त्रीयदृष्ट्या या घटनेला 'पिधान युती' असे संबोधले जाते. चंद्राच्या शेजारी चमकणारा हा तेजस्वी बिंदू तारा नसून सूर्यप्रकाश परावर्तित करणारा शुक्र ग्रह आहे. ग्रामीण भागात त्याला 'शुक्राची चांदणी' किंवा 'सांजतारा' म्हणून ओळखले जाते. सूर्यास्तानंतर पश्चिम क्षितिजावर दिसलेले हे विलोभनीय दृश्य काही काळ आकाशाचे सौंदर्य खुलवत राहिले. या खगोलीय घटनेमुळे विज्ञानप्रेमी आणि नागरिकांना अवकाशातील अद्भुत घडामोडीचे प्रत्यक्ष साक्षीदार होता आले.

## मोबाईलवर प्रश्न शोधून कॉपी

### युवकाविरुद्ध कोतवालीत गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : नगर कॉलेजमधील परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरू असताना मोबाईलचा वापर करून प्रश्नांची उत्तरे शोधत कॉपी करणाऱ्या युवकाविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमोल राजेंद्र ढाकणे असे गुन्हा दाखल झालेल्या युवकाचे नाव आहे. न्यायालयाच्या लेखी आदेशानंतर रविवारी (दि. १३) रात्री उशिरा ही कारवाई करण्यात आली. याबाबत छगन रघुनाथ पोकळे (सहाय्यक अधीक्षक, सह दिवाणी न्यायालय, कर्जत) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार, २६ एप्रिल २०२६ रोजी दुपारी साडेतीन ते चार वाजण्याच्या सुमारास नगर कॉलेजमधील परीक्षा केंद्रावर ही घटना घडली. परीक्षा सुरू असताना अमोल ढाकणे याने परीक्षा हॉलमध्ये बेकायदेशीररीत्या विनापरवाना मोबाईल बाळगला होता. परीक्षा कालावधीत त्याने मोबाईलवर प्रश्न शोधून त्याद्वारे कॉपी केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. तसेच प्रवेशपत्रावरील उमेदवारांसाठीच्या सूचना क्रमांक सहाचे उल्लंघन केल्याचेही समोर आले आहे. या प्रकरणी न्यायालयाच्या लेखी आदेशानंतर महाराष्ट्र विद्यापीठ मंडळ व इतर विनिर्दिष्ट परीक्षांमधील गैरप्रकार प्रतिबंधक कायद्यानुसार कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस उपनिरीक्षक अमीना शेख करीत आहेत. दरम्यान, राज्यात विविध स्पर्धात्मक परीक्षांमधील गैरप्रकारांच्या पार्श्वभूमीवर परीक्षा केंद्रावर मोबाईलचा वापर करून कॉपी करणाऱ्या युवकाविरुद्ध न्यायालयाच्या आदेशाने गुन्हा दाखल झाल्याने परीक्षार्थी आणि परीक्षा यंत्रणेत खळबळ उडाली आहे.

## प्रेरणा मल्टीस्टेटचा १०० कोटी ठेवींचा टप्पा पार

### आर्थिक शिस्तीमुळे प्रेरणा मल्टीस्टेटची प्रगतीकडे वाटचाल : सुरेश वाबळे




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : गेल्या १४ वर्षांच्या काळात प्रेरणा मल्टीस्टेट संस्थेने काळानुरूप बदल केले असून अत्याधुनिक सुविधा, ठेविदार खातेदारांना संस्था देत आहे . प्रेरणा मल्टीस्टेट ने १०० कोटी ठेवींचा टप्पा पूर्ण केला असून संस्थेतील आर्थिक शिस्तीमुळेच संस्थेची यशस्वी वाटचाल सुरू असल्याचे प्रतिपादन प्रेरणा मल्टीस्टेटचे संस्थापक चेअरमन सुरेश वाबळे यांनी केले. प्रेरणा मल्टीस्टेटच्या चौदाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये ते बोलत होते . सुरेश वाबळे म्हणाले की , प्रेरणा मल्टीस्टेटच्या आठ शाखा असून आगामी काळात गोव्यातील म्हापसा येथे लवकरच शाखा सुरू होणार आहे . तसेच नगर शहर , केसनंद (वाघोली ) आणि पुण्यातील भोसरी येथेही शाखा सुरू करण्याबाबत संस्थेच्या संचालक मंडळाचे प्रयत्न सुरू आहेत.

प्रेरणा मल्टीस्टेट यंदा अकरा टक्के लाभांश सभासदांना देणार आहे. केंद्रीय सहकार मंत्री अमित भाई शहा यांनी सहकार मंत्री झाले नंतर सहकार कायदयातनवीन सुधारणा केल्या तसेच सहकार विभागात अनेक बदल घडवून आणल्याने अनेक संस्थांमध्ये कारभारात पारदर्शकता दिसून येत आहे . प्रेरणा मल्टीस्टेटच्या सर्व शाखांमध्ये लवकरच सभासदांना ऑनलाइन खात्यात पैसे देण्याची सुविधा सुरू करणार आहे. यावेळी झाली . अहिल्या नगर जिल्हा सहकारी पतसंस्था स्थैर्य निधी अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल शिवाजीराव कपाळे यांचा सत्कार करण्यात आला . तसेच नगर जिल्हा सहकारी बँकेचे वरिष्ठ अधिकारी संजय वर्पे यांची जिल्हा बँकेच्या सहकारी पतसंस्थेच्या संचालक मंडळावर निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला .तसेच राहुरी येथील डॉ . आप्पासाहेब दुस यांची आरोग्य विभागात वरिष्ठ पदावर पदोन्नती झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

अहवाल वाचन जनरल मॅनेजर अनिल वर्पे यांनी केले. यावेळी चेअरमन सुजित वाबळे. साई आदर्श मल्टी स्टेटचे चेअरमन शिवाजी कपाळे व संस्थेचे संचालक विष्णुपंत वर्पे, दादासाहेब उर्हेर, रविंद्र राऊत, राजेंद्र वर्पे, नंदकुमार दिघे, रावसाहेब शिंदे, अक्षय ओहळ तर प्रेरणा पतसंस्थाचे व्हा चेअरमन मच्छिंद्र हुरुळे, अशोक उर्हे, श्रीकांत जगधने, दिलीप जगताप लक्ष्मण तांबे, नारायण जाधव नंदकुमार भराडीया रश्मित तरकसे जगन्नाथ वरखडे धनंजय दळे, संतोष खर्डे, उत्तमराव गाडे,सुरेश शिरसाठ, मदन गागरे, जगन्नाथ वर्पे व सर्व कर्मचारी वृंदआदी उपस्थित होते. संचालक प्रा.विशाल वाबळे यांनी स्वागत तर मल्टीस्टेटचे उपाध्यक्ष प्रा. वेणूनाथ लांबे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## शिर्डीत पुजेच्या नावाखाली प्लास्टिक बदामाची विक्री

### बनावट पुजा साहीत्य नगरपालिकेकडून जप्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**




**शिर्डी** : गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर पूजेचे साहित्य खरेदीसाठी आलेल्या भाविकांची फसवणूक होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शिर्डीतील वर्दळीच्या डोखे मार्केट परिसरातील फुटपाथवर काही विक्रेत्यांकडून खऱ्या बदामाच्या जोडीला किंवा पॅकमध्ये हुबेहूब दिसणाऱ्या प्लास्टिकच्या बनावट बदामांची विक्री सुरू असल्याचे उघडकीस आले आहे. नगरपालिकेच्या पथकाने यावरही धडक कारवाई केली आहे. गणेश चतुर्थीनिमित्त नैवेद्यासाठी व पूजा साहित्य खरेदी करण्याकरिता शिर्डीतील डोखे मार्केट व आजूबाजूच्या परिसरात भाविकांची प्रचंड गर्दी जमली होती.

या गर्दीचा फायदा घेत काही विक्रेत्यांनी खऱ्या बदामांमध्ये प्लास्टिकचे बनावट बदाम मिसळून फुटपाथवर थाटून भाविकांची दिशाभूल चालवली होती. काही भाविकांच्या हा प्रकार लक्षात आल्यानंतर त्यांनी याबाबत त्वरित शिर्डी नगरपालिकेच्या पथकाकडे धाव घेऊन तक्रार नोंदवली.तक्रार प्राप्त होताच नगरपालिकेच्या अतिक्रमण पथकाने डोखे मार्केट परिसरातील संबंधित फुटपाथवर छापा टाकून सदर मालजप्त करत विक्रेत्यांना नगरपालिकेत अधीक चौकशी साठी तब्यात घेतले आहे .सण-उत्सवाच्या काळात अशा प्रकारे भाविकांच्या श्रद्धेचा आणि आरोग्याचा गैरफायदा घेऊन होणाऱ्या फसवणुकीपासून सावध राहण्याचे आवाहन नगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

## बेलवंडी मुरुम-मातीच्या हप्त्यावरून कोयत्याने प्राणघातक हल्ला

### अल्पवयीनसह आरोपीसह तिघे ताब्यात; फरारींचा शोध सुरू

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**श्रीगोंदा** : मुरूम-मातीचे हप्ते देत नसल्याच्या कारणावरून बेलवंडी-श्रीगोंदा रस्त्यावर वाहन अडवून कोयता व लोखंडी रॉडने प्राणघातक हल्ला केल्याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई करत अल्पवयीन मुलासह तीन संशयित आरोपींना ताब्यात घेतले आहे. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली असून, हल्ल्यात सहभागी असलेल्या इतर आरोपींचा शोध सुरू आहे. दि. १० सप्टेंबर रोजी रात्री नितीन ज्ञानदेव हिरवे (रा. बेलवंडी) हे साक्षीदारासह बेलवंडी ते श्रीगोंदा रस्त्याने घरी जात असताना स्वीफ्ट कारने त्यांचे वाहन अडविण्यात आले. मुरूम-मातीचे हप्ते देत नसल्याच्या कारणावरून सचिन भागवत, सुजीत इथापे यांच्यासह १० ते १५ अनोळखी व्यक्तींनी हिरवे व इतरांना जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने कोयता व लोखंडी रॉडने मारहाण केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी बेलवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्राणघातक हल्ल्याची माहिती मिळताच अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेला समांतर तपास करून आरोपींचा शोध घेण्याचे आदेश दिले. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली दोन तपास पथके तयार करण्यात आली. गोपनीय बातमीदार तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास सुरू असताना १३ सप्टेंबर रोजी सचिन उर्फ चिंग्या सोपान भागवत हा साथीदारांसह थार वाहनातून नांदगाव शिंगवे नाईक परिसरात असल्याची माहिती पथकाला मिळाली. पथकाने तेथे धाव घेतली असता थारजवळ दोन जण आढळून आले. पोलिसांची चाहूल लागताच वाहनातील काही जण थार भरधाव वेगाने घेऊन पसार झाले. मात्र पथकाने गाडीजवळील सचिन उर्फ चिंग्या सोपान भागवत (वय २९, रा. चिंभळा, ता. श्रीगोंदा) आणि १७ वर्षीय विधीसंघर्षीत बालक (रा. कोळगाव, ता. श्रीगोंदा) यांना ताब्यात घेतले.

तपासादरम्यान काही आरोपी आळेफाटा मार्गे मुंबईकडे जाणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर पथकाने आळेफाटा बायपास परिसरात सापळा रचला. नाशिक-पुणे मार्गावरील उड्डाणपुलाखाली शोध घेत असताना संजय उर्फ बाबा मोहन पवार (वय ३१, रा. गव्हाणवाडी, ता. श्रीगोंदा) आणि अमोल पोपट ब्राम्हणे (वय ३१, रा. जोशीवाडी, ता. शिरूर, जि. पुणे) यांना ताब्यात घेण्यात आले. ताब्यात घेतलेल्या सचिन उर्फ चिंग्या भागवत याच्याकडे चौकशी केल्यानंतर गुन्ह्यातील इतर साथीदारांची माहिती पोलिसांना मिळाली असून, फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी तपास यंत्रणा सक्रिय झाली आहे. ताब्यातील आरोपींना पुढील तपासासाठी बेलवंडी पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले असून, या प्रकरणाचा पुढील तपास बेलवंडी पोलीस करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, सपोनि हरीष भोये तसेच पोलीस अंमलदारांच्या पथकाने केली.

## आश्वी पोलिसांनी शोधले ११ हरविलेले मोबाईल

### १ लाख ९८ हजार ४९५ रुपयांचे मोबाईल तक्रारदारांना परत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : आश्वी पोलीस ठाण्याच्या हद्दीत नागरिकांचे हरविलेले व गहाळ झालेले मोबाईल फोन शोधण्यासाठी राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेला यश आले असून, पोलिसांनी विविध कंपन्यांचे तब्बल ११ मोबाईल फोन शोधून काढले आहेत. या मोबाईलची अंदाजे किंमत १ लाख ९८ हजार ४९५ रुपये आहे. विशेष म्हणजे संगमनेर तालुक्यातील निमगाव जाळी येथील संकेत विजय आरगडे यांचा हरविलेला मोबाईल पोलिसांनी थेट आसाम राज्यातून हस्तगत केला. दि. १ जानेवारी ते १४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत ही विशेष मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेदरम्यान पोलिसांनी सीईआयआर प्रणालीचा प्रभावी वापर केला. तसेच मोबाईलचे आयएमईआय क्रमांक, तांत्रिक माहिती आणि उपलब्ध नेटवर्क तपशीलांच्या आधारे हरविलेल्या मोबाईलचा माग काढण्यात आला. या कारवाईत सॅमसंग, विवो आणि ओप्पो कंपनीचे एकूण ११ मोबाईल फोन शोधण्यात आश्वी पोलिसांना यश आले. संबंधित तक्रारदारांची खात्री करून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर हे मोबाईल त्यांना परत करण्यात आले. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, उपविभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच आश्वी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार गणेश तुकाराम तळपाडे यांनी ही कामगिरी केली. मोबाईल हरविल्यानंतर त्याचा आयएमईआय क्रमांक जतन करून ठेवावा.

तसेच तत्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करून सीईआयआर संकेतस्थळावरून मोबाईल अवरोधित करण्याची प्रक्रिया करावी, असे आवाहन आश्वी पोलिसांनी केले आहे.

## तीन महिन्यांपासून पोलिसांना गुंगारा देणारा श्रीरामपूरचा आरोपी जेरबंद



**पोलीस उपनिरीक्षक मनोज अहिरे**

वांबोरी येथील गुन्ह्यातील आरोपींचा तपास करत असताना मिळालेल्या गुप्त खबरीनुसार श्रीरामपूर तालुक्यातील संघटित गुन्ह्यातील फरार आरोपी धनराज जाधव याला १२

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : श्रीरामपूर येथील तरुणावर साईनाथ जाधव टोळीतील पाच आरोपींनी प्राणघातक हल्ला केला होता या गुन्ह्यातील चार आरोपी जेरबंद करण्यात पोलिसांना यश आले होते परंतु एक फरार होता. या टोळीतील आरोपींवर या अगोदरही आठ गुन्हे दाखल आहेत. या गुन्ह्यातील सराईत गुन्हेगाराला वांबोरी पोलिसांनी वांबोरी- अहिल्यानगर रोडवरील वांबोरी घाट परिसरात सापळा रचून सीताफिने जेरबंद केले. पोलिसांच्या धाडसी कारवाईचे वांबोरी परिसरातून कौतुक होत आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेले सविस्तर असे की,धनराज सुनील जाधव, वय २०, राहणार दत्तनगर, श्रीरामपूर असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून दिनांक १९ जुन २०२६ रोजी श्रीरामपूर शहरात दहशतमाजून संघटित गुन्हेगारी करणाऱ्या साईनाथ जाधव टोळीने हितेश ब्राह्मणे वय १८ याच्यावर धारदार शस्त्राने प्राणघातक हल्ला करून गंभीर जखमी केले होते.

या टोळीचा म्होरक्या साईनाथ जाधव, राहुल उर्फ चिमण्या बागुल, सुजित संजय कोळगे ,रितेश बाबासाहेब आढाव यांना या अगोदरच गुन्ह्यात अटक केलेली आहे तर फरार आरोपी धनराज जाधव श्रीरामपूर या पाच जणांवर गुन्हा नंबर ५९३/ २०२६ श्रीरामपूर पोलीस स्टेशन येथे दाखल आहे या गुन्ह्यात वरील चार आरोपीना अटक करण्यात आली होती मात्र धनराज जाधव हा मागील तीन महिन्यांपासून फरार होता. त्याला शोधण्यासाठी श्रीरामपूर पोलिसांची पथक कसोशीने शोध घेत होती. परंतु अनेक वेळी पोलिसांना गुंगारा देण्यात आरोपी यशस्वी झाला.

दरम्यान एका गुन्ह्याच्या तपासासाठी राहुरीचे पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मनोज अहिरे, सहाय्यक पोलीस फौजदार बबन राठोड, हेड कॉन्स्टेबल अशोक झिने, पोलीस कॉन्स्टेबल सचिन ठोंबरे यांच्यासह संभाजी चौधरी तपास करत असताना गुप्त खबऱ्यामार्फत श्रीरामपूर येथील गुन्ह्यातील आरोपी नगर वरून वांबोरीच्या दिशेने येत असल्याची माहिती समजली त्यानुसार सापळा रचून वांबोरी घाट परिसरात धनराज जाधव आल्यानंतर त्याच्या मुसक्या आवळण्यात पोलिसांना यश आले. पोलिसांच्या या धाडसी कामगिरीमुळे परिसरातून मोठे कौतुक होत आहे.

## ३ लाख ३० हजारांच्या दागिन्यांसह सोलापूरची 'गुलाबी गँग'श्रीरामपुरात जेरबंद!

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**श्रीरामपूर** : दहीहंडी उत्सवानिमित्त शहरात पेट्रोलिंग सुरू असताना पोलिसांनी संशयावरून दोन महिलांना ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून २२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे नेकलेस व कर्णफुले तसेच काळ्या मण्यांचे पेंडल असा एकूण ३ लाख ३० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अटक करण्यात आलेल्या महिला सोलापूर येथील आहेत. श्रीरामपूर शहर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ७ सप्टेंबर २०२६ रोजी पोलिस उपनिरीक्षक रोशन निकम यांना गोविंदराव आदिक चौक, वॉर्ड क्रमांक १ परिसरात दोन महिला सोन्याच्या वस्तूंसह संशयास्पदरीत्या फिरत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार महिला पोलीस अंमलदाराच्या मदतीने हिना लाल्ला शेख (वय ४५) आणि रुक्मिणा लाला शेख (वय २०), दोघी रा. कुमार चौक, कोटेर चाळ, सोलापूर यांना ताब्यात घेऊन झडती घेण्यात आली. झडतीमध्ये १५ ग्रॅम वजनाचा सोन्याचा नेकलेस, ५ ग्रॅम वजनाची दोन सोन्याची कर्णफुले आणि २ ग्रॅम वजनाचे काळ्या मण्यांचे पेंडल आढळून आले. सोन्याच्या वस्तूंबाबत समाधानकारक माहिती न दिल्याने पोलिसांना त्या चोरीच्या असल्याचा संशय आला. याप्रकरणी महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील कलम १२४ अन्वये गुन्हा क्रमांक ८७६/२०२६ नोंद करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

जप्त मुद्देमाल पुढील कारवाईसाठी संगमनेर शहर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक सुदर्शन मुमक्का, अपर पोलीस अधीक्षक सोमिनाथ वाघचौरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.